

सत्यमेव जयते


**महाराष्ट्र शासन**

## आदिवासी विकास विभाग





# आदिम अनुसूचित जमातींसाठी राबविलेल्या शासकिय लाभांच्या योजनांचा मूल्यमापन अहवाल
# सन (२००८-०९)






**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१.**

# आदिम अनुसूचित जमातींसाठी राबविलेल्या शासकीय लाभांच्या योजनांचा मूल्यमापन अहवाल

सन २००८-०९

# : : अ नु क्र म णि का : :


| प्र. क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| | प्रस्तावना<br>आदिम अनुसूचित जमाती शासकिय लाभाच्या योजनांचा मूल्यमापन अहवाल | ३ | - |
| १) | मूल्यमापनाचे उद्देश | ४ | - |
| २) | कार्यपध्दती | ५ | ६ |
| ३) | पृथःकरण | | |
| | ३.१) क्षेत्रीय पाहणी | ७ | ८ |
| | ३.२) लिंगभेदानुसार वर्गीकरण | ९ | ११ |
| | ३.३) साक्षरता | १२ | १५ |
| | ३.४) शैक्षणिक स्तर | १६ | १९ |
| | ३.५) आरोग्य | २० | २१ |
| | ३.६) जमीन धारणा | २२ | २१ |
| | ३.७) स्थलांतर | २८ | ३० |
| | ३.८) घरांची स्थिती | ३१ | ३३ |
| | ३.९) पशुधन | ३४ | ३६ |
| | ३.१०) व्यवसायानुसार वर्गीकरण | ३७ | ३९ |
| | ३.११) देण्यात आलेल्या लाभाच्या योजना | ४० | ४३ |
| | ३.१२) योजनांच्या माहितीचा स्त्रोत | ४४ | ४६ |
| | ३.१३) माहिती असलेल्या योजनांची संख्या | ४७ | - |
| | ३.१४) आर्थिक स्थिती | ४८ | ५४ |
| | ३.१५) योजनेत मिळालेल्या लाभाची स्थिती | ५५ | ५६ |
| | ३.१६) योजनेमुळे झालेला फायदा | ५७ | ५८ |
| | ३.१७) योजना निहाय विश्लेषण | ५९ | ६३ |
| | ३.१८) योजना राबविण्यातील अडचणी व उपाययोजना | ६४ | ६५ |
| ४) | कातकरी, कोलाम व माडीया या अतिमागास जमातींचे अभ्यासपूर्ण विश्लेषण | ६६ | ७१ |
| ५) | सारांश | ७२ | ७३ |
| ६) | निष्कर्ष | ७४ | - |

# प्रस्तावना

महाराष्ट्रातील एकूण (४७) अनुसूचित जमातींपैकी कातकरी, कोलाम व माडीया गोंड या आदिम जमाती आहेत.सदर जमातींची आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक उन्नती होण्यासाठी शासनाकडून काही विशेष योजना राबविल्या जातात.

सदर योजनांच्या आदिम जमातींसाठी झालेल्या लाभाची पडताळणी करुन कोणत्या योजना त्यांना विशेष उपयोगी पडतात, तसेच कोणत्या योजना आदिम जमातींसाठी फारशा लाभदायक नाहीत याबाबतची मूल्यमापन पाहणी करण्यात आली.

सदर मूल्यमापन पाहणीचे क्षेत्रीय काम श्रीमती ए.एस्.काळे (प्र.उपसंचालक), श्री. पी.बी.कुदळे (सं.सहा.), श्री. यु.एम.यादव (आरेखक), श्री.डी.ए.कसबे (सां.सं.) व श्री. आर.एस्.पवार (अन्वेषक) यांनी पूर्ण केले असून, अहवाल लेखनाचे काम श्रीमती ए.एस्.काळे प्र.उपसंचालक यांनी पूर्ण केलेले आहे.

सदर मूल्यमापन पाहणी अहवाल आदिम जमातींसाठी योजनांची आखणी व अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना उपयोगी पडेल अशी अपेक्षा आहे.

दिनांक :
ठिकाण : पुणे

(डॉ. अरविंदकुमार झा)
आयुक्त
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

# प्रकरण - १

## मूल्यमापनाचे उद्देश

महाराष्ट्रातील आदिवासींच्या एकूण ४७ जमातींपैकी, १) कातकरी, २) कोलाम, व ३) माडिया (गोंड) हया तीन जमाती आदिम जमाती आहेत.

त्यांच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक उन्नतीसाठी शासनाकडून काही विशेष योजना राबविल्या जातात. सदर योजनांच्या आदिम जमातींना झालेल्या लाभाची पडताळणी करुन, कोणत्या योजना त्यांना विशेष उपयोगी पडतात, तसेच कोणत्या योजना आदिम जमातींसाठी फारशा लाभदायक नाहीत,हयाचे पृथ:करण करण्यासाठी आदिम जमातीच्या लाभार्थींची पाहणी करण्यात आली.

मूल्यमापनाची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१) आदिम जमातींना शासकिय योजना फायदेशीर ठरल्या आहेत किंवा नाहीत, हे पडताळणे.

२) त्यांच्या उत्पन्नात योजना राबविल्यामुळे झालेल्या वाढीची पडताळणी करणे.

३) आदिम जमातींच्या आर्थिक/शैक्षणिक व सामाजिक स्तरातील बदलाचा अभ्यास करणे.

४) योजना राबविताना लाभार्थ्यांना व योजना राबविण्या-या यंत्रणेला आलेल्या अडचणींचा अभ्यास करणे .

*******

# प्रकरण - २

## कार्यपध्दती

महाराष्ट्रातील आदिम जमातींना दिलेल्या विविध योजनांच्या लाभाची पडताळणी करण्याकरीता आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या एक्षेविका कक्षाकडून मूल्यमापन पाहणी घेण्यात आली. सदर मूल्यमापनासाठी कुटुंबाची वैयक्तिक माहिती, कुटुंबाचा मुख्य व दुय्यम व्यवसाय, कुटुंबाची भूधारणा, कुटुंबाचे योजनेपूर्वीचे व नंतरचे उत्पन्न, कुटुंबातील व्यक्तींचे वय, शिक्षण, आरोग्य इत्यादी बाबींची माहिती घेण्यात आली.

महाराष्ट्रातील आदिवासी जमातींपैकी तीन जमाती आदिम असून, त्यापैकी ठाणे व रायगड जिल्हयामध्ये कातकरी, नांदेड व यवतमाळ जिल्हयात कोलाम व गडचिरोली जिल्हयात माडिया (गोंड) हयांचे वास्तव्य आहे.

कातकरी जमातींची पाहणी करण्यासाठी ठाणे व रायगड जिल्हयातील काही गावे, कोलामांच्या पाहणीसाठी नांदेड जिल्हयातील काही गावे व माडिया (गोंड) जमातीच्या पाहणीसाठी गडचिरोली जिल्हयातील काही गावे निवडण्यात आली.

पाहणीसाठी संशोधन अधिकारी, संशोधन सहाय्यक, अन्वेषक, सांख्यिकी सहाय्यक व आरेखक यांचा समावेश असलेल्या पथकाव्दारे माहिती गोळा करण्यात आली.

पथकातील व्यक्तींची माहिती खालीलप्रमाणे आहे.

### पथक

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचा-याचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १) | श्रीमती ए. एस्. काळे | संशोधन अधिकारी |
| २) | श्री. पी. बी. कुदळे | संशोधन सहाय्यक |
| ३) | श्री. यु. एम्. यादव | आरेखक |
| ४) | श्री. आर. एम्. पवार | अन्वेषक |
| ५) | श्री. दीपक कसदे | सांख्यिकी सहाय्यक |

आदिम जमातींना विविध बाबींसाठी अनुदान दिलेल्या लाभधारकांची जिल्हा/तालुका निहाय यादी; एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय पेण, जव्हार, किनवट, अहेरी, सिरोंचा व भामरागड या प्रकल्प कार्यालयाकडून घेण्यात आली. यादीतील विविध बाबींसाठी लाभधारकास मिळालेल्या लाभाची, लाभधारकास प्रत्यक्ष भेटून पाहणी करण्यात आली.

*******

# प्रकरण - ३

## पृथःकरण

### ३.१ क्षेत्रीय पाहणी

या कार्यालयाकडून पाहणी करण्यात आलेल्या लाभधारकांची जिल्हा/तालुका/गाव निहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | गावाचे नाव | जमातीचे नाव | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | ठाणे | जव्हार | १) आखर | कातकरी | १२ |
| | | | २) कुतूरविहीर | | १२ |
| | | | ३) दिसकोड | | ११ |
| | | | ४) नांदगाव | | ७ |
| | | | ५) केळघर | | ५ |
| | | | ६) न्याहाळे | | ५ |
| | | मोखाडा | १) चास | | ३ |
| | एकूण | | | | ५५ |
| २. | रायगड | खालापूर | १) शिरोली | कातकरी | ३ |
| | | | २) वावोशी | | ११ |
| | | | ३) उंबरे | | ६ |
| | | | ४) जांभीवली | | ९ |
| | | कर्जत | १) वंजारवाडी | | ५ |
| | | | २) लाखाची वाडी | | १० |
| | | | ३) वाकस | | २ |
| | | | ४) अवसरे | | १० |
| | | | ५) मांडवणे | | ४ |
| | एकूण | | | | ६० |
| ३. | नांदेड | किनवट | १) मांडवा | कोलाम | १३ |
| | | | २) पिंपळगाव | | १ |
| | | | ३) बेल्लोरी | | ६ |
| | | | ४) सोनापूर | | २ |
| | | | ५) घोगरवाडी | | ७ |
| | | माहूर | १) माहूर | | ८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | २) पाटोदा | | ४ |
| | | | ३) जावरला | | ३ |
| | | | ४) नागापूर | | ६ |
| | **एकूण** | | | | **५०** |
| ४. | गडचिरोली | अहेरी | १) झिंगानूर | माडिया | १४ |
| | | | २) शिरकुंडा | | ३ |
| | | | ३) रोमपल्ली | | ८ |
| | | सिरोंचा | १) गर्कापेठ | | १२ |
| | | | २) वेनल्या | | ५ |
| | | भामरागड | १) निरगुडवंचा | | ६ |
| | | | २) भामरागड | | ३ |
| | | | ३) दुबागुडा | | ३ |
| | | | ४) हेमलकसा | | ६ |
| | | | ५) हेमलकसा(टोला) | | ३ |
| | | | ६) ताडगाव | | २ |
| | **एकूण** | | | | **६५** |

*******

## ३.२ लिंगभेदानुसार वर्गीकरण

### १) कातकरी

पाहणी केलेल्या कातकरी जमातीच्या ११५ लाभार्थी कुटुंबांचे लिंगभेदानुसार तालुका निहाय वर्गीकरण पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तालुका | गाव संख्या | लाभार्थी कुटुंब संख्या | लोकसंख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुरुष | स्त्री | एकूण |
| १) | खालापूर | ४ | २९ | ६२ | ५६ | ११८ |
| २) | कर्जत | ५ | ३१ | ८२ | ६३ | १४५ |
| **एकूण (रायगड)** | | **९** | **६०** | **१४४** | **११९** | **२६३** |
| १) | जव्हार | ६ | ५२ | १४८ | १४९ | २९७ |
| २) | मोखाडा | १ | ३ | ८ | ३ | ११ |
| **एकूण (ठाणे)** | | **७** | **५५** | **१५६** | **१५२** | **३०८** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, रायगड जिल्हयातील खालापूर व कर्जत हया दोन्ही तालुक्यातील पुरुषांचे प्रमाण स्त्रियांपेक्षा जास्त आहे. कर्जत मध्ये तर हे प्रमाण १ हजार पुरुषांमागे ७६८ स्त्रिया असे धक्कादायक आहे.

रायगड व ठाणे जिल्हयामधील स्त्रियांचे कमी असलेले हे प्रमाण निश्चितच चिंताजनक आहे. निकट असलेल्या मुंबई सारख्या शहरी संस्कृतीचा हा परिपाक आहे असे म्हणावे लागेल.

### २) कोलाम

कोलाम जमातीच्या पाहणी केलेल्या ५० लाभार्थी कुटुंबांची तालुकानिहाय लोकसंख्या पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तालुका | सदस्य | कुटुंब संख्या | एकूण | लोकसंख्या | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पुरुष | स्त्री |
| १) | किनवट | १२२ | २९ | १२२ | ५९ | ६३ |
| २) | माहूर | ८८ | २१ | ८८ | ४२ | ४६ |
| एकूण (नांदेड) | | २१० | ५० | २१० | १०१ | १०९ |

वरील तक्त्यातील आकडेवारी विचारात घेता ५० लाभार्थ्यांच्या हया पाहणीवरुन असे दिसते की,कोलामांच्या सर्व लाभार्थी कुटुंबांमध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे.

किनवट तालुक्यात ते १ हजार पुरुषांमागे १०६७ स्त्रिया असे असून, माहूरमध्ये ते १०९५ स्त्रिया असे असल्याचे दिसते. नांदेड जिल्हयातील हया दोन्ही तालुक्यातील लाभार्थींच्या कुटुंबांचा विचार केला असता, स्त्रियांचे प्रमाण दर हजारी पुरुषांमागे १०७९ आढळते. पाहणी केलेल्या ५० लाभार्थी कुटुंबातील ० ते ६ वर्षाच्या बालकातील मुला-मुलींचे प्रमाण खालीलप्रमाणे आढळले.

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | कुटुंबसंख्या | मुलगा | मुलगी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १) | किनवट | २९ | ५ | १० | १५ |
| २) | माहूर | २१ | २ | १२ | १४ |
| | **एकूण (नांदेड)** | **५०** | **७** | **२२** | **२९** |

### ३) माडीया

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | लाभार्थी संख्या | लिंगभेदानुसार वर्गीकरण | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुरुष | स्त्री | एकूण |
| १) | गडचिरोली | अहेरी | २५ | ६८ | ६३ | १३१ |
| २) | | सिरोंचा | १७ | ४९ | ४९ | ९८ |
| ३) | | भामरागड | २२ | ४९ | ६० | १०९ |
| | | **एकूण** | **६४** | १६६ | १७२ | ३३८ |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, सिरोंचा व अहेरी प्रकल्पातील "माडीया" हया आदिम जमातीच्या लोकसंख्येत स्त्री/पुरुषांचे प्रमाण साधारणपणे सारखेच आहे. त्यात फारशी तफावत आढळत नाही. मात्र भामरागड प्रकल्पातील आकडेवारी अभ्यासली असता, पुरुषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण जास्त असून ते दर १ हजार पुरुषांमागे १२९४ स्त्रिया इतके असल्याचे आढळते.

लोकसंख्येची ही आकडेवारी मुलींच्या गर्भाची हत्त्या करण्याच्या परंपरांचा पायंडा इथे पडला नसल्याच्या परिणितीची द्योतक ठरते. स्त्री/पुरुष भेद इथे फारसा आढळत नाही. स्त्रिया समजून घेतात, प्रश्न विचारतात, पुढे येऊन चौकशी करतात असे आढळले. झिंगानूर या गावात मात्र माडीया भाषेच्या प्राबल्यामुळे असेल पण स्त्रिया माहिती देण्यास उत्सुक दिसल्या नाहीत.

कुटुंबाच्या आकाराचा विचार करता, माडीया जमातीच्या कुटुंबाचा आकार सरासरी कुटुंबाच्या आकारापेक्षा थोडा मोठा आढळतो. हयावरुन असे म्हणता येईल की, कुटुंब नियोजनासारख्या चांगल्या धोरणाचा उपयोग करणाऱ्या हया समाजापर्यंत स्त्रीभृण हत्येसारख्या चुकीच्या कल्पनांचे लोण अद्याप पोहोचलेले नाही. कोलामांच्या ५० कुटुंबातील एकूण सर्व सदस्यांचा विचार करता स्त्रियांचे प्रमाण

लक्षणीय आहेच पण ० ते ६ वर्षामधील बालकांमध्ये तर मुलींचे प्रमाण मुलांच्या पेक्षा फारच जास्त आहे. अर्थातच मुलांची वाट पाहण्यात ही मुलींची संख्या वाढत जाते ही वस्तुस्थिती सुध्दा आहेच. त्यांच्याशी साधलेल्या संवादातून हे लक्षात आले.

*******

## ३.३ साक्षरता

### १) कातकरी

आदिम जमातीपैकी कातकरींच्या साक्षरतेचा अभ्यास करण्यासाठी खालीलआकडेवारीकडे पहावे लागेल.

| अ.क्र. | जिल्हा/तालुका | लाभार्थी कुटुंब संख्या | एकूण सदस्य | साक्षर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | % | एकूण | पुरुष | स्त्री |
| १) | खालापूर | २९ | ११८ | ३३ | ३९ | २६ | १३ |
| २) | कर्जत | ३१ | १४५ | ३० | ४३ | ३१ | १२ |
| **एकूण (रायगड)** | | **६०** | **२६३** | **३१** | **८२** | **५७** | **२५** |
| १) | जव्हार | ५२ | २९७ | ३९ | ११५ | ६७ | ४८ |
| २) | मोखाडा | ३ | ११ | ४५ | ५ | ४ | १ |
| **एकूण (ठाणे)** | | **५५** | **३०८** | **३९** | **१२०** | **७१** | **४९** |

वरील तक्त्यावरुन रायगड व ठाणे जिल्हयातील कातकरींचे साक्षरतेचे प्रमाण फार कमी असल्याचे दृष्टोत्पत्तीस येते. रायगड जिल्हयातील खालापूर तालुक्यात ३३% जनता साक्षर असून कर्जत तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण ~~४२~~ 30% आहे.

तसेच हया दोन तालूक्यात स्त्री/पुरुषांच्या साक्षरतेच्या प्रमाणातही फार मोठी तफावत आहे. खालापूर तालुक्यात ४२% पुरुष साक्षर असून, स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण फक्त २३% म्हणजे जवळ जवळ पुरुषांच्या निम्मे आहे.

तर कर्जत तालुक्यात ३६% पुरुष साक्षर असून फक्त २०% स्त्रिया साक्षर आहेत. एकूणच साक्षरतेचे प्रमाण रायगड जिल्हयात फारच थोडे आहे आणि स्त्रियांची साक्षरता अतिशयच कमी आहे. दर ५ स्त्रियांपैकी फक्त एकच स्त्री साक्षर आहे.

ठाणे जिल्हयातील साक्षरतेचे प्रमाण ३९% इतके असून, ४६% पुरुष साक्षर आहेत. साक्षरतेचे स्त्रियांमधील प्रमाण फक्त ३२% आहे. मोखाडा तालुक्यात पुरुष साक्षरतेचे प्रमाण ५०% असून, ~~२३~~ 33% स्त्रिया साक्षर आहेत. ठाणे जिल्हयात तीन स्त्रियांपैकी एक स्त्री शिकलेली आहे.

मुंबईसारख्या निकट शहरामुळे स्त्रियांच्या संख्येत घट होत असताना साक्षरेतेचे प्रमाणावर मात्र शहरीकरणाचा काही सकारात्मक परिणाम झालेला दिसत नाही.

## २) कोलाम

पाहणी केलेल्या कोलाम जमातीच्या ५० लाभार्थी कुटुंबातील साक्षरतेचे प्रमाण खालील प्रमाणे आढळले.

| अ.क्र. | तालुका | लाभार्थी कुटुंब संख्या | एकूण सदस्य | साक्षर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | % | एकूण | पुरुष | स्त्री |
| १) | किनवट | २९ | १२२ | ५६ | ६८ | ३९ | २९ |
| २) | माहूर | २१ | ८८ | ५३ | ४७ | २६ | २१ |
| **एकूण (नांदेड)** | | **५०** | **२१०** | **५५** | **११५** | **६५** | **५०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, किनवट व माहूर हया दोन्ही तालुक्यातील कोलाम समाजातील साक्षरतेचे प्रमाण ५४ ते ५५% च्या आसपास आहे. त्यातही दोन्ही तालुक्यातील पुरुष साक्षरता ६०% पेक्षा जास्त आहे व स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण ४६% इतकेच आहे. तसेच किनवट तालुक्यातील किनवट पासून जवळ असलेल्या (५ कि.मी.) मांडवा पिंपळगाव हया गावातील साक्षरतेचे प्रमाण ६०% असले तरी दुर्गम ठिकाणी वसलेल्या घोगरवाडी हया गावातील साक्षरतेचे प्रमाण केवळ ३३% आहे. तर स्त्रियांचे प्रमाण त्यापेक्षाही कमी आहे.

माहूर तालुक्यातील खुद्द माहूर हया तालुक्याच्या गावातील साक्षरतेचे प्रमाण फक्त ४३% असून, फक्त ३३% स्त्रिया साक्षर असल्याचे आढळले आहे. माहूर येथील माहूरगड हया साडेतीन शक्तीपीठापैकी एक असलेल्या देवीच्या स्थानामुळे लोकांची सतत वर्दळ असते. बँका, शाळा, दवाखाने इत्यादी सर्व सुविधाही आहेत. परंतु देवदेवतांमुळे प्रसिध्द पावलेल्या हया गावाने आधुनिकतेचे वारे मात्र लागू दिले नाही असे म्हणावे लागते. जाबरला गावातील स्त्री-पुरुष साक्षरतेचे प्रमाणही ३३% आहे.

## ३) माडीया

| अ.क्र. | तालुका | लाभार्थी कुटुंब | एकूण सदस्य | साक्षरतेचे प्रमाण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | % | एकूण | पुरुष | स्त्री |
| १) | अहेरी | २५ | १३१ | ४४ | ५७ | ४० | १७ |
| २) | सिरोंचा | १७ | ९५ | ४८ | ४६ | २६ | २० |
| ३) | भामरागड | २३ | १०९ | ६६ | ७२ | ३५ | ३७ |
| **(गडचिरोली)** | | **६५** | **३३५** | **५२** | **१७५** | **१०१** | **७४** |


अहेरी, सिरोंचा व भामरागड हया तीन प्रकल्पातील मडीया जमातीच्या एकूण ६५ कुटुंबांची पाहणी केली असता असे आढळले की, ५२% लोकसंख्या साक्षर आहे. साक्षरतेचे प्रमाण भामरागड प्रकल्पात जास्त म्हणजे ६६% असून, सिरोंचा प्रकल्पात ते ४८% व अहेरी प्रकल्पात हे प्रमाण ४४% आहे. मात्र साक्षरतेचा लिंगभेदानुसार विचार करता, भामरागड प्रकल्पात साक्षरतेमध्ये लिंगभेदानुसार फारसा फरक पडत नाही. अहेरी व सिरोंचा प्रकल्पात पुरुषांची साक्षरता स्त्रियांच्या साक्षरतेच्या पावणेदोन पट (१.७७) आहे. ५६% पुरुष साक्षर असून केवळ ३२% स्त्रिया साक्षर आहेत. निरक्षर स्त्रियांचे हे मोठे प्रमाण त्यांच्या सर्वांगीण जीवनावर परिणाम करते.

भामरागड प्रकल्पातील एकूणच आदिवासी सामाजिक उन्नतीच्या वाटेवर आहे. लोकबिरादरी प्रकल्पाच्या प्रभावामुळे त्यांच्यात वैचारिक पातळी थोडी तरी उंचावली आहे हे निश्चित.


भामरागड प्रकल्पातील निरगुडवंचा हया मुख्य रस्त्यापासून १४ किलोमीटर आत असलेल्या व खरोखरच कच्चा रस्ताही नसलेल्या संपूर्ण डोंगराळ व जंगलाने वेढलेल्या, केवळ पाऊलवाटांनी मुख्य रस्त्यांशी संपर्कात असलेल्या गावात पाहणी केलेल्या ६ लाभधारक कुटुंबातील एकूण ३१ व्यक्तींपैकी २१ व्यक्ती साक्षर आहेत व हे प्रमाण ६८% आहे. विशेष म्हणजे २१ साक्षरांपैकी १५ स्त्रिया आहेत. स्त्रियांच्या साक्षरतेचे हया गावातील प्रमाण ७१% आहे. हयाच गावातील अनेक जणांनी माध्यमिक शिक्षणापर्यंत मजल मारली आहे हे विशेष.

हया उलट परिस्थिती सिरोंचा प्रकल्पातील वेनलया गावात आहे. वेनलया हे गाव मुख्य रस्त्यापासून पाच किलोमिटर अंतरावर आहे. हे ही गाव जंगल व्याप्त आहे. मात्र हया गावात जाण्यास मुख्य रस्त्यापासून पक्का रस्ता आहे. हे गाव डोंगराळ नाही. बालवाडी पासून इ.४ थी पर्यंत शाळा आहे. परंतु साक्षरतेचे प्रमाण अगदी अल्प म्हणजे ३३% आहे. एकूण साक्षरांपैकी ७०% पुरुष असून स्त्रिया फक्त ३०% साक्षरआहेत. प्रत्यक्ष भेटीतून व संभाषणातून हया दोन प्रकल्पातंर्गत असलेल्या या दोन गावातील हा फरक ठळकपणे नजरेत भरला.

# साक्षरता



साक्षरता
६०
५०
४०
३०
२०
१०
०
३९%
५५%
५२%
साक्षरता
कातकरी
कोलाम
माडीया

महिलांची साक्षरता
५०%
४०%
३०%
२०%
१०%
०%
२७%
४६%
४२%
महीलांची साक्षरता
कातकरी
कोलाम
माडीया

## ३.४ शैक्षणिकस्तर

### १) कातकरी

ठाणे जिल्हयातील साक्षर कातकरी लाभार्थी कुटुंबाच्या शैक्षणिक स्तराची माहिती पाहीली असता, ~~७४~~ ७९% साक्षरांनी १ ते ७ वी पर्यंत शिक्षण घेतलेले आहे. ह्यात स्त्री-पुरुष अशी लिंगभेदानुसार तफावत नाही. त्यापुढे मात्र ८ वी ते १० वीच्या गटात पुरुष ~~९३~~ ८६% असून, स्त्रिया फक्त ~~७~~ १४% आहेत. दोन पुरुषांनी ११ वी व १२ वीचे शिक्षण घेतलेले असून, तीन पुरुष पदवीधर आहेत. हयावरुन असे स्पष्ट होते की, आधीच साक्षरता कमी आहे व फक्त ~~२६~~ २०% साक्षरांनी प्राथमिक शिक्षणाच्या पुढे पाऊल टाकले आहे. त्यात स्त्रिया मात्र नगण्य आहेत. जसा शैक्षणिक स्तर उंचावत जातो, तसतसा स्त्रियांच्या शिक्षणाचा आलेख उतरत जातो. ही सार्वत्रिक परिस्थिती इथेही आहे.

**" शिकलेली आई घरादाराला पुढे नेई "** अशी घोषवाक्ये प्रसारणाचा कातकऱ्यांवर काही परिणाम झालेला दिसत नाही. स्त्रियांना जुजबी शिक्षण दिले जाते. व आश्रमशाळांमुळेही त्यात फारसा फरक पडलेला दिसत नाही. लिहीण्या-वाचण्यानंतर स्त्रियांचे गळतीचे प्रमाण वाढत जाते. त्यामुळे कातकरी समाज सुधारणेच्या मार्गावर प्रगती करु शकत नाही.

**शैक्षणिक स्तर**

| अ.क्र. | जिल्हा/ तालुका | कुटुंब संख्या | ~~लाभार्थी~~ एकूण सदस्य | १ ते ४ | | ५ ते ७ | | ८ ते १० | | १२ वी | | पदवी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री |
| १) | खालापूर | २९ | ११८ | १६ | ७ | ५ | ५ | ३ | १ | ० | ० | ० | ० |
| २) | कर्जत | ३१ | १४५ | १८ | १० | ९ | १ | ४ | १ | ० | ० | ० | ० |
| **एकूण (रायगड)** | | **६०** | **२६३** | **३६** | **१७** | **१४** | **६** | **७** | **२** | **०** | **०** | **०** | **०** |
| १) | जव्हार | ५२ | २९७ | २१ | २६ | १९ | १९ | २२ | ३ | २ | ० | ३ | ० |
| २) | मोखाडा | ३ | ११ | ३ | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० |
| **एकूण (ठाणे)** | | **५५** | **३०८** | **२४** | **२७** | **१९** | **१९** | **२३** | **३** | **२** | **०** | **३** | **०** |

## २) कोलाम

कोलाम जमातीच्या पाहणी केलेल्या ५० लाभार्थी कुटुंबाच्या साक्षर व्यक्तींच्या शैक्षणिक पात्रतेकडे नजर टाकली असता खालील परिस्थिती आढळते..

**शैक्षणिक स्तर**

| तालुका | कुटुंब संख्या | ~~लाभार्थी~~ एकूण सदस्य | १ ते ४ | | ५ ते ७ | ८ ते १० | | १२ वी | | पदवी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्री | पुरुष | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री |
| १) किनवट | २९ | १२२ | १७ | १६ | ~~१२~~ 10 | ५ | २ | २ | ० | ० | १ |
| २) माहूर | २१ | ८८ | १३ | १७ | ९ | २ | १ | १ | ० | ० | ० |
| **एकूण** | **५०** | **२१०** | **३०** | **३३** | **२१** | **७** | **३** | **३** | **०** | **०** | **१** |

वरील आकडेवारीवरुन असे निदर्शनास येते की, किनवट व माहूर हया दोन्ही तालुक्यात जरी ५५% च्या आसपास साक्षरता असली तरी दोन्ही तालुक्यातील एकूण ११५ साक्षर व्यक्तींपैकी तीन व्यक्तींना केवळ लिहीता-वाचता येते. दोन जण बालवाडीत आहेत. उरलेल्या ११० साक्षर व्यक्तींनी शालेय शिक्षण घेतलेले आहे. हया ११० शिक्षित व्यक्तींपैकी ~~५६~~ 63 व्यक्तींचे शिक्षण फक्त १ ते ४ थी पर्यंतच झाले आहे. हे प्रमाण ~~५३~~ 56% आहे. उरलेल्या ~~५४~~ 46 शिक्षितांपैकी ~~२९~~ 33 व्यक्ती हया ५ ते ७ पर्यंत शिकलेल्या आहेत. हे प्रमाण ~~२८~~ 30% आहे. उरलेल्या ~~२१~~ 18 शिक्षित व्यक्तींपैकी ~~९~~ 10 व्यक्ती ८ वी ते १० वी च्या दरम्यान शिक्षण घेतलेल्या असून त्यांचे प्रमाण ~~८~~ 9% इतके आहे. इयत्ता १० वी ते १२ वी च्या दरम्यान तीन व्यक्तींनी शिक्षण घेतले असून हे प्रमाण केवळ २% आहे. पदवीपर्यंत म्हणजे बी. कॉम्. (व्दितीय वर्ष) पर्यंत किनवट जवळील मांडवा गावातील एकाच व्यक्तीने शिक्षण घेतले असून विशेष म्हणजे ती स्त्री आहे. परंतु हा अपवाद वगळता जसजशी शैक्षणिक पात्रता वाढत जाईल तसतशी स्त्रियांची संख्या कमी होत जाते असे स्पष्ट दिसते. ४९ साक्षर स्त्रियांपैकी ६७% स्त्रियांनी १ ते ४ थी पर्यंत शिक्षण घेतले असून, २४% स्त्रिया ५ ते ७ वी पर्यंत शिकलेल्या आहेत. थोडक्यात ९२% साक्षर स्त्रिया जास्तीत जास्त ७ वी पर्यंत शिकल्या आहेत. एकूणच कोलाम समाज शैक्षणिकदृष्टया उन्नत नाही. ~~८२~~ 83% कोलाम समाज ७ वी पर्यंतच्या शिक्षणाशीच थांबला आहे. हयाचे मुख्य कारण प्राथमिक शाळा गावोगावी असून तेथपर्यंतचे शिक्षण सहजगत्या मिळत असल्याने तिथपर्यंतच्या शिक्षणात प्रगती दिसते. माध्यमिक शिक्षणासाठी शहरात जाऊन राहण्याइतकी कोलामांची आर्थिक परिस्थिती नाही व मानसिकताही नाही.

शेवटी याचा परिणाम त्यांच्या आर्थिक व सामाजिक प्रगती वरही अपरिहार्यपणे झालेला आढळतो.

पाहणी केलेल्या ५० कुटुंबांची मुले आश्रमशाळेत शिक्षणासाठी असल्याचे कोणत्याही कुटुंबाकडून समजले नाही. अर्थात कुटुंबातील किती मुले आश्रमशाळेत शिक्षण घेतात असा नेमका प्रश्न जरी त्यांना विचारण्यात आला नसला तरी कुटुंबातील सदस्यांची माहिती सांगताना सहज ओघात हयाबाबत कोणीही माहिती दिलेली नाही व तसे आढळलेले देखील नाही.

### ३) माडीया

साक्षर माडीया समाजाच्या शैक्षणिक पात्रतेचा अंदाज येण्यासाठी खालील तक्त्यातील आकडेवारी पाहणे उद्‌बोधक ठरेल.

| तालुका | कुटुंब संख्या | १ ते ४ थी | | ५ ते ७ वी | | ८ ते १० वी | | १२ वी | | पदवी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री |
| १) अहेरी | २५ | १४ | ८ | ९ | ३ | ४ | १ | १० | २ | १ | १ |
| २) सिरोंचा | १७ | ७ | ८ | १ | ४ | ११ | ५ | ४ | १ | ० | २ |
| ३) भामरागड | २३ | १२ | १४ | ५ | १५ | ११ | २ | २ | १ | ४ | ४ |
| **एकूण** | **६५** | **३३** | **३०** | **१५** | **२२** | **२६** | **८** | **१६** | **४** | **५** | **७** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, माडीयांच्या पाहणी केलेल्या ६५ कुटुंबातील एकूण ३३८ व्यक्तींपैकी १७५ व्यक्ती साक्षर आहेत. हया १७५ व्यक्तींमध्ये भामरागड प्रकल्पात ७२ साक्षर व्यक्ती असून, सिरोंचा प्रकल्पामध्ये ४८ व अहेरी प्रकल्पात ५७ व्यक्ती साक्षर आहेत.

भामरागड प्रकल्पातील ७२ पैकी सात जण बालवाडीत वा अंगणवाडीत शिकत असून ६४ व्यक्तींनी शालेय शिक्षण घेतले आहे. त्यातील २६ व्यक्ती ४ थी पर्यंत शिकल्या असून २० व्यक्ती ७ वी पर्यंत शिकल्या आहेत. म्हणजेच साक्षरांपैकी ७५% साक्षर व्यक्तींचे प्राथमिक शिक्षण झाले आहे. गावोगावी माध्यमिक शाळांची सोय नसल्याने प्राथमिक शिक्षणानंतर शिक्षण घेण्याचे थांबते. माध्यमिक शिक्षण घेतलेल्या व्यक्तींचे प्रमाण १८% असून, त्यापुढे फक्त ७% लोक शिकले आहेत. शैक्षणिक स्तरासंदर्भात स्त्रियांचा विचार केल्यास ९९% साक्षर स्त्रियांनी फक्त प्राथमिक शिक्षण घेतले असून, फक्त एकच स्त्री १२ वी झाली आहे. इतर सर्व समाजाप्रमाणेच इथेही शिक्षणासंदर्भात पुरुषाच्या

शिक्षणाला प्राधान्य देण्यात येते. त्यामुळे सहज उपलब्ध होणारे प्राथमिक शिक्षण संपले की स्त्रियांचे शिक्षण थांबविले जाते. आश्रमशाळेत सुविधा उपलब्ध असून सुध्दा स्त्रियांना घरापासून दूर ठेवण्याच्या मानसिकतेत बदल झालेला नाही असाच हयाचा अर्थ आहे.

अहेरी व सिरोंचा मध्ये असलेल्या एकूण ~~१०३~~ १०५ साक्षर व्यक्तींपैकी सात व्यक्ती अंगणवाडीत शिकत असून ३७ व्यक्तींनी ४ थी पर्यंत व १७व्यक्तीनी ७वी पर्यंत शिक्षण घेतले आहे. हयाचाच अर्थ ~~६०~~ ५१% व्यक्तींची मजल माध्यमिक शिक्षणापर्यंत गेलेली नाही. १० वी पर्यंत २१ व्यक्ती शिकल्या असून विशेष म्हणजे १७ म्हणजे १६% व्यक्तींनी १२ वी पर्यंत शिक्षण घेतले असून चार जणांनी पदवी घेतली आहे.

भामरागड प्रकल्पापेक्षा शैक्षणिक स्तराची ही स्थिती चांगली आहे.सिरोंचा प्रकल्पातिल शिरकूंडा, रोमपल्ली व गर्कापेठा ही गावे रस्त्यावर आहेत. झिंगानुर येथेही १२ वी पर्यंतची आश्रमशाळा असून, ही आश्रमशाळा एकेकाळी जिल्हयात पहिल्या क्रमांकावर होती. स्त्रियांच्या शिक्षणाबाबत मत मांडायचे झाल्यास भामरागड प्रकल्पाचीच स्थिती हया प्रकल्पामध्ये असून शिरकुंडा गावातील पाच महिलांपैकी फक्त एक महिला साक्षर आहे व ती ४ थ्या इयत्तेपर्यंत शिकली आहे. साधारणपणे शिक्षणाच्या पहिल्या टप्प्यावर स्त्रियांची संख्या आधीच्या टप्प्याच्या निम्मी झालेली दिसते.

*******

## ३.५ आरोग्य

### १) कातकरी

कातकरी हया आदिम जमातीच्या ११५ लाभार्थी कुटुंबाच्या पाहणीचे वेळी त्यांच्या आरोग्याची ते कशी काळजी घेतात उपचारासाठी कोणता मार्ग अवलंबितात हयाची माहिती घेण्यात आली. ती खालील तक्त्यात नमूद केली आहे.

| अ.क्र. | जिल्हा/तालुका | आरोग्य उपचार कोठे घेतात वर्गीकरण | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | घरगुती | भगत | पारंपारिक | दवाखाना |
| १) | खालापूर | २ | ४ | ० | २९ |
| २) | कर्जत | ३ | ५ | ० | ३१ |
| एकूण (रायगड) | | ५ | ९ | ० | ६० |
| १) | मोखाडा | - | ४ | १ | ५२ |
| २) | जव्हार | - | १ | - | ३ |
| एकूण (ठाणे) | | - | ५ | १ | ५५ |

वरील तक्त्यावरुन असे लक्षात येईल की, रायगड जिल्हयातील खालापूर व कर्जत हया दोन्ही तालुक्यातील कातकरी समाज आरोग्य रक्षणासाठी दवाखान्याची मदत घेतो. अपवादात्मक परिस्थितीत ते भगताकडे जात असले किंवा पारंपारिक उपचार करत असले तरी आरोग्य समस्या सोडविण्यासाठी सर्वच्या सर्व ६० कुटुंबांची मदार दवाखान्यावरच आहे.

तसेच कुटुंबातून दीर्घ आजाराने त्रस्त असे कोणी नजरेस आले नाही. स्त्रिया गरोदरपणात तपासणी व औषधांसाठी दवाखान्यात जातात असे सांगण्यात आले.

### २) कोलाम

कोलाम समाजाच्या पाहणी केलेल्या किनवट व माहूर हया दोन तालुक्यात आरोग्याच्या गंभीर समस्या कोणाकडून मांडण्यात आल्याचे निदर्शनास आले नाही. दीर्घ आजाराने कुटुंबात कोणी आजारी असल्याचे आढळले नाही. लोक आजारपणावर उपचारासाठी, मार्गदशनासाठी, बाळाच्या लसीकरणासाठी, गरोदर माता नोंदणीसाठी व तपासणीसाठी दवाखान्यात जातात असे आढळले. भगताच्या समाजाभोवतीचा विळखा संपूर्णपणे सुटला नसला तरी तो निश्चितपणे हळूहळू सैलावत आहे. लोक अजूनही भगताकडे सनातन परंपरेमुळे निर्माण झालेल्या स्वतःच्या मानसिक दबावामुळे जात असले तरी त्याचबरोबर ते दवाखान्यातील वैदयकिय उपचारही घेत आहेत. भगताला ते पूर्णपणे टाळू

शकत नसले तरी त्याचा प्रभाव झपाटयाने ओसरु लागला आहे. खालील तक्त्यावरुन ही बाब प्रकर्षाने ध्यानात येईल.

| आरोग्य उपचार | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **तालुका** | **कुटुंब संख्या** | **घरगुती** | **भगत** | **पारंपारिक** | **दवाखाना** |
| १) | किनवट | २९ | ६ | २ | ३ | २४ |
| २) | माहूर | २१ | ५ | २ | ४ | १७ |
| | **एकूण :-** | **५०** | **११** | **४** | **७** | **४१** |

वरील आकडेवारी पाहता, पाहणी केलेल्या ५० कुटुंबांपैकी ८२% कुटुंबे आरोग्य उपचारासाठी दवाखान्यात जात असल्याचे आढळले. किनवट व माहूर या दोन्ही तालुक्यात हे प्रमाण सारखेच आहे. दवाखान्यात न जाणारे त्या खालोखाल घरगुती उपचार घेतात असे आढळते. प्रसूती घरी होत असली तरी प्रसूतीपूर्व तपासणीचे महत्व त्यांना पटले आहे. कुटुंबाचा आकारही मर्यादित असून कुटुंबनियोजनाचे प्रमाण लक्षणीय आहे.

**३) माडीया**

भामरागड प्रकल्पातील पाहणी केलेल्या २३ कुटुंबातील २२ कुटुंबांकडून दवाखान्याचा वापर होत असून फक्त निरगुडवंचा हया गावातील एकाच कुटुंबात आजारी पडल्यावर भगताकडे जाण्याची परंपरा आहे. बाकी पाहणी केलेली कुटुंबे जरी भगताकडे गेली तरी दवाखान्यात जातातच असे चित्र आढळते. मात्र पारंपारिक वा घरगुती उपचाराचा वापर आता लोकांकडून होत नाही असे दिसते. भगताकडे मात्र पूर्ण पाठ फिरविणे त्यांना जमलेले नाही.

अहेरी व सिरोंचा प्रकल्पातील पाहणी केलेल्या ४२ कुटुंबातील ३८ कुटुंबे दवाखान्याचा लाभ घेतात. ४ कुटुंबांकडून पारंपारिक व एका कुटुंबाकडून घरगुती उपचारांचा वापर होतो ~~व~~ ह्यापैकीच १४ कुटुंबे भगताला धरुन आहेतच असे आढळले. खालील तक्त्यातून ही बाब अधिक स्पष्ट होईल.

**आरोग्य उपचार**

| अ.क्र. | तालुका | कुटुंब संख्या | घरगुती | भगत | पारंपारिक | दवाखाना |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | अहेरी | ३ (२५) | ० | ८ | १ | २३ |
| २) | सिरोंचा | २ (१७) | ० | ६ | ४ | १५ |
| ३) | भामरागड | ६ (२३) | ० | ५ | ० | २२ |
| | एकूण :- | ११ (६५) | ० | १९ | ५ | ६० |

*******

## ३.६ जमीनधारणा

### १) कातकरी

कातकरी हया आदिम समाजाची जमीन धारणा स्थिती फारशी चांगली नाही. रायगड व ठाणे जिल्हयातील जमीन धारणेची स्थिती खालील तक्त्यात दाखविली आहे.

**तक्ता**

| अ.क्र. | तालुका | कुटुंब संख्या | भूधारक | भूमीहीन |
|---|---|---|---|---|
| १) | खालापूर | २९ | १० + १ | १८ |
| २) | कर्जत | ३१ | ६ | २५ |
| **एकूण (रायगड)** | | **६०** | **१७** | **४३** |
| १) | जव्हार | ५२ | ३३ | १९ |
| २) | मोखाडा | ३ | २ | १ |
| **एकूण (ठाणे)** | | **५५** | **३५** | **२०** |
| **एकूण कातकरी** | | **११५** | **५२** | **६३** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, रायगड जिल्हयातील खालापूर व कर्जत तालुक्यातील एकूण ६० लाभार्थी कुटुंबापेकी १७ कुटूंबे जमीन कसतआहेत. एक कुटुंब वनखात्याची जमीन कसत आहे. ६० पैकी १६ कुटुंबे भूधारक आहेत. उर्वरित ७३% कुटुंबे भूमीहीन आहेत.

ठाणे जिल्हयातील जव्हार व मोखाडा तालुक्यातील ५५ लाभार्थ्यांपैकी ३५ लाभार्थी ~~भूमीहीन~~ भूधारक असून २० लाभार्थी ~~भूधारक~~ भूमीहीन आहेत. ३० ~~भूमीहीनां~~ भूधारकांशिवाय ३ जण खंडाने जमीन कसत असून; दोन लाभार्थी कुटुंबे वनखात्याची जमीन कसत आहेत. ही पाच लाभार्थी कुटुंबे जमीन कसत असली तरी ती त्यांच्या मालकीची नाही. भूधारणेचे प्रमाण ५५% आहे.

हया भूधारक कुटुंबांनी धारण केलेल्या जमिनीच्या क्षेत्राची माहिती खालील तक्त्यात देण्यात आली आहे.

**धारण केलेल्या जमिनीची मालकी**


| अ.क्र. | तालुका | कुटुंब संख्या | स्वतःची | मालकी हक्क | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | जंगल खात्याची | खंडाची |
| १) | खालापूर | २९ | १० | १ | ० |
| २) | कर्जत | ३१ | ६ | -- | ० |
| एकूण :- (रायगड) | | ६० | १६ | १ | ० |
| १) | जव्हार | ५२ | २८ | २ | ३ |
| २) | मोखाडा | ३ | २ | ० | ० |
| एकूण :- (ठाणे) | | ५५ | ३० | २ | ३ |

## वहितीखालील क्षेत्र

| अ.क्र. | तालुका | कुटुंब संख्या | भूधारक | क्षेत्र हे. आर. मध्ये | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | जिरायत | बागायत | एकूण |
| १) | खालापूर | २९ | ११ | ८.०० | १.४० | ९.४० |
| २) | कर्जत | ३१ | ६ | २.६६ | २.७४ | ५.४० |
| **एकूण:- (रायगड)** | | **६०** | **१७** | **१०.६६** | **४.१४** | **१४.८०** |
| १) | जव्हार | ५२ | ३३ | ३१.४० | १.२० | ३२.६० |
| २) | मोखाडा | ३ | २ | १.२० | ०.०० | १.२० |
| **एकूण :- (ठाणे)** | | **५५** | **३५** | **३२.६०** | **१.२०** | **३३.८०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, रायगड व ठाणे जिल्हयातील भूधारकांनी धारण केलेले जमिनीचे क्षेत्र फारच कमी आहे. त्यांची गणना अल्प भूधारकांमध्येच होईल.

रायगड जिल्हयात भूधारण क्षेत्राचा सरासरी आकार ८७ आर असून (२ एकर) ठाणे जिल्हयात तो ९७ आर आहे. रायगड जिल्हयात १७ भूधारकांनी १४.८० हेक्टर क्षेत्र धारण केले असून; ठाणे जिल्हयातील ३५ भूधारकांनी ३३.८० हेक्टर क्षेत्र धारण केले आहे. रायगड जिल्हयापेक्षा ठाणे जिल्हयात भूधारकांची संख्या जास्त आहे. पण भूधारणेच्या प्रमाणात फारशी तफावत नाही.




रायगड जिल्हयातील एकूण १४.८० हेक्टर क्षेत्रापैकी ४.१४ हेक्टर क्षेत्र बागायत असून; हे प्रमाण २७% आहे. तर ठाणे जिल्हयातील ३३.८० हेक्टर क्षेत्रापैकी फक्त १.२० हेक्टर क्षेत्र बागायत असून; हे प्रमाण केवळ ३.५% आहे.

इतक्या अल्प बागायत क्षेत्रामुळे भूधारकांना मिळणारे शेतीचे उत्पन्नही अल्प स्वरुपच आहे. त्यांना जमीन तारण ठेवून कर्ज मिळविणे शेतीतील सोयी सुविधा वाढविणे वगैरे बाबी अल्पभूधारणेमुळे व बागायतीच्या अभावामुळे शक्य होत नाहीत. हया शेतक-यांची सर्व मदार पावसावर असून निसर्गाच्या लहरीनुसार दारिद्रयाच्या हिंदोळयावर तो झुलत राहतो.

## २) कोलाम

कोलाम या आदिम समाजाच्या जमीनधारणेच्या दृष्टीने विचार करता खालील परिस्थिती आढळते.

### जमीन धारणा

| अ.क्र. | तालुका | कुटुंब संख्या | भूधारक | भूमीहीन |
|---|---|---|---|---|
| १) | किनवट | २९ | ८ | २२ |
| २) | माहूर | २१ | १० | १२ |
| **एकूण** | | **५०** | **१८** | **३४** |

### जमीन धारणेची मालकी

| अ.क्र. | तालुका | कुटुंब संख्या | स्वत:ची | जंगल खात्याची | खंडाची | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | किनवट | २९ | ७ | १ | ० | ८ |
| २) | माहूर | २१ | ९ | ० | १ | १० |
| **एकूण** | | **५०** | **१६** | **१** | **१** | **१८** |

### वहिती खालील क्षेत्र


| अ.क्र. | तालुका | कुटुंब संख्या | भूधारक | क्षेत्र हे. आर. मध्ये | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | जिरायत | बागायत | एकूण |
| १) | किनवट | २९ | ७ | १५.४ | २.८ | १८.२ |
| २) | माहूर | २१ | ९ | १७.६ | ० | १७.६ |
| **एकूण** | | **५०** | **१६** | **३३** | **२.८** | **३५.८** |

वरील आकडेवारी पाहता किनवट व माहूर तालूक्यात कोलाम जमातीच्या ५० लाभार्थीपैकी १६ कुटुंबे भूधारक असून, हे प्रमाण फक्त ३२% आहे व ह्यात जमीन वाटप हया योजनेचा लाभ घेतलेली सात कुटुंबे अंतर्भूत आहेत ती वगळली तर योजनेचा लाभ मिळण्याआधी फ़क्त नऊ कुटुंबेच भूधारक होती व हे प्रमाण १८% इतके अत्यल्प होते.

भूधारणेचे किनवट तालुक्यातील प्रमाण २४% इतके असून, माहूर तालुक्यात हेच प्रमाण ४३% आहे. जमीन वाटप योजनेत जमिनीचा लाभ मिळालेली सात कुटुंबे माहूर तालुक्यातच आहेत. जमीन वाटप योजनेपूर्वी माहूर तालुक्यातील भूधारणेचे प्रमाण फक्त ९% एवढेच होते.

भूधारक लाभार्थ्यांचे ९१% क्षेत्र जिरायत असून, केवळ ९% क्षेत्र बागायत आहे. ज्याप्रमाणे भूधारकांचे प्रमाण फार कमी आहे त्याचप्रमाणे भूधारकांनी धारण केलेले क्षेत्रही किनवट तालुक्यात सरासरी २.६ हेक्टर असून माहूर तालुक्यात ते सरासरी १.९५ हेक्टर आहे.

एक लाभार्थी कुटुंब वनविभागाची दोन हेक्टर जमीन कसत असून एका लाभार्थी कुटुंबाने एक हेक्टर जमीन खंडाने कसावयास घेतली आहे.




## ३) माडीया

कोलाम, कातकरी व माडीया हया महाराष्ट्रातील तीन आदिम आदिवासी जमातींपैकी जमीन धारणेमध्ये माडीयांचा प्रथम क्रमांक लागतो.

पाहणी केलेल्या माडीया जमातीच्या ६५ कुटुंबांमध्ये भामरागड प्रकल्पातील दुब्बागुडा गावातील फक्त एकच कुटुंब भूमीहीन आहे. बाकी सर्व कुटुंबाकडे कमी अधिक प्रमाणात जमीन आहेच; मग ती बागायती असेल नाहीतर जिरायती.

जमीन धारणेचे प्रमाणही काही फार मोठे नाही. पण स्वतःच्या जमिनीमुळे येणारी प्रतिष्ठा व स्थैर्य याही फार महत्वाच्या बाबी आहेत. त्यामुळे संपूर्ण उदरनिर्वाह चालतो असे नव्हे पण अख्खी भाकरी हवी असेल तर तुकडयाचा तरी आधार मिळतो.

भामरागड प्रकल्पातील २३ कुटुंबांपैकी २२ कुटुंबे भूधारक असून ताडगाव, हेमलकसा व दुब्बागुडा गावांमधील भूधारकांची जमीन बागायत आहे. निरगुडवंचा, भामरागड व हेमलकसाटोला हया गावात बागायती नाही. निवडलेल्या भूधारकांपैकी फक्त दोन भूधारकांची जमीन ओलीताखाली असून, सिरोंचा प्रकल्पातील गर्कापेठा गावातील बारा भूधारकांपैकी सात जणांची जमीन पाण्याखाली आहे.

भामरागड प्रकल्पात २३ कुटुंबांकडे ४६ हेक्टर जमीन असून, हे प्रमाण घरटी २ हेक्टर असे असल्याचे दिसते. अहेरी व सिरोंचा मधील ४२ कुटुंबांकडे ६१ हेक्टर जमीन आहे म्हणजे सरासरी दीड हेक्टर क्षेत्र एका कुटुंबाच्या मालकीचे आहे असे आढळते. हयामुळे शेती बऱ्याच कुटुंबांचा मुख्य व्यवसाय असून ते अन्नाला मोताद आहेत असे आढळत नाही.


जमीन धारणेविषयीची परिस्थिती खालील आकडेवारीवरुन अधिक स्पष्ट होईल.

## जमिनीची मालकी

| अ.क्र | तालुका | गावांची संख्या | कुटुंब संख्या | स्वतःची | जंगल खात्याची | खंडाची | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अहेरी | ३ | २५ | २४ | ० | ० | २४ |
| २) | सिरोंचा | २ | १७ | १७ | ० | ० | १७ |
| ३) | भामरागड | ६ | २३ | २१ | १ | ० | २२ |
| **एकूण :-** | | **११** | **६५** | **६२** | **१** | **०** | **६३** |


## वहितीखालील क्षेत्र

| अक्र. | तालुका | गावांची संख्या | कुटुंब संख्या | भूधारक | क्षेत्र हे. आर. मध्ये | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | जिरायत | बागायत | एकूण |
| १) | अहेरी | ३ | २५ | २४ | ३६ | २.६ | ३८ |
| २) | सिरोंचा | २ | १७ | १७ | ७ | ८.७ | १६ |
| ३) | भामरागड | ६ | २३ | २२ | ५० | ६.५ | ५७ |
| **एकूण :-** | | **११** | **६५** | **६३** | **९३** | **१८** | **१११** |




## माडीया जमीन धारणा

| अ.क्र. | तालुका | गावे | कुटुंब संख्या | भूधारक | भूमीहीन |
|---|---|---|---|---|---|
| १) | अहेरी | ३ | २५ | २४ | १ |
| २) | सिरोंचा | २ | १७ | १७ | ० |
| ३) | भामरागड | ६ | २३ | २२ | १ |
| **एकूण :-** | | **११** | **६५** | **६३** | **२** |



## ३.७ स्थलांतर

कच्च्या स्वरुपाची घरे, अल्प उत्पन्न व स्थानिक पातळी वरील रोजंदारीचा अभाव हयामुळे स्थलांतर करणे ही आदिम जमातींची परंपराच होती. अल्प भूधारणेमुळे शेतीवर गुजराण होणे शक्यच नव्हते व जंगलातून भटकत वनौपजे गोळा करुन चरितार्थ चालवित असल्याने स्थलांतर हा आदिम जमातीचा स्थायीभाव होता.

परंतु आता शासनाने पक्क्या स्वरुपाची घरे त्यांना दिल्याने कायम निवा-याची सोय उपलब्ध झाल्यावर त्यांची एकाच ठिकाणी राहण्याची मानसिकता वाढत आहे.

### १) कातकरी

कोणत्या मोसमात किती कातकरी काही काळासाठी स्थलांतर करतात हयाबाबत माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

| **अ.क्र.** | **तालुका** | **एकूण कुटुंबे** | **स्थलांतर वर्गीकरण** | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | **पावसाळा** | **उन्हाळा** | **हिवाळा** |
| १) | जव्हार | ५२ | - | २० | १९ |
| २) | मोखाडा | ३ | - | - | - |
| | एकूण | **५५** | **-** | **२०** | **१९** |
| १) | खालापूर | २९ | - | ३ | ३ |
| २) | कर्जत | ३१ | - | ८ | ८ |
| | **एकूण** | **६०** | **-** | **११** | **११** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, रायगड जिल्हयातील खालापूर तालुक्यातील चार गावातील २९ कुटुंबांपैकी फक्त तीनच कुटुंबे स्थलांतर करतात तर कर्जत तालुक्यातील पाच गावातील ३१ कुटुंबातील आठ कुटुंबे स्थलांतर करुन रोजगार मिळवतात. खालापूर पेक्षा कर्जत तालुक्यातील कातकऱ्यांची स्थलांतर करण्याची प्रवृत्ती जास्त दिसते.

ठाणे जिल्हयातील जव्हार तालुक्यातील ४४% कुटुंबे अद्यापही स्थलांतर करतात. मोखाडा मधील तीन कुटुंबांचीच पाहणी केली असून हयापैकी कोणी स्थलांतर करत नाही.

## २) कोलाम

स्वत:च्या मालकीची जमीन नसल्याने बारमाही रोजगार उपलब्ध होत नसल्याने व उपजीविकेचे अन्य साधन नसल्याने कोलाम जमातीच्या समाजासही स्थलांतर करावे लागतेच पण ज्यामानाने भूधारक व त्यांची भूधारणा कमी आहे. तसेच रोजगाराचाही अभाव आहे. त्यामानाने स्थलांतराचे प्रमाण फार कमी आहे असे दिसते.

पुढील तक्त्यावरुन ही बाब अधिक स्पष्ट होईल.

**स्थलांतर**

| अ.क्र. | तालुका | कुटुंब संख्या | स्थलांतर करणारी कुटुंबे | | | स्थलांतर न करणारी कुटुंबे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | उन्हाळा | हिवाळा | एकूण | एकूण |
| १) | किनवट | २९ | ४ | १ | ५ | २४ |
| २) | माहूर | २१ | १ | ३ | ४ | १७ |
| **एकूण :-** | | **५०** | **५** | **४** | **९** | **४१** |

वरील आकडेवारीवरुन असे दिसते की, पाहणी केलेल्या ५० कुटुंबांपैकी ४१ कुटुंबे स्थलांतर करत नाहीत व फक्त नऊ कुटुंबे रोजगारार्थ भटकतात हे प्रमाण फक्त १८% इतकेच आहे. किनवट व माहूर हया दोन्ही तालुक्यात हे प्रमाण साधारण सारखेच आहे.


शासनाने विविध योजना राबवून हया आदिम कोलाम समाजाला पक्की घरे बांधून दिल्याने तसेच जमीन वाटप योजना राबविल्याने हया समाजाचा स्थलांतराकडील कल कमी झाला आहे.

## ३) माडीया

गडचिरोली जिल्हयातील भामरागड व अहेरी व सिरोंचा प्रकल्पातील पाहणी केलेल्या माडीया जमातींच्या ६५ कुटुंबांपैकी ६३ कुटुंबे भूधारक असल्याने स्थलांतराचे प्रमाण नगण्य आहे. फार थोडी कुटुंबे कामधंदयासाठी स्थलांतर करतात. मात्र भामरागड प्रकल्पातील पाहणी केलेल्या २३ कुटुंबांपैकी एकही व्यक्ती स्थलांतर करत नाही असे आढळले. अहेरी व सिरोंचा प्रकल्पातील झिंगानूर गावातील पाहणी केलेल्या १४ कुटुंबातील ४ कुटुंबे स्थलांतर करतात व रोमपल्ली गावातील पाहणी केलेल्या ८ कुटुंबांपैकी ३ कुटुंबे स्थलांतर करतात असे आढळले. थोडक्यात स्थलांतराचे प्रमाण ~~१०~~ ६% आहे असे दिसते.

माडीयांच्या स्थलांतरासंबधीची माहिती खालील तक्त्यात दिलेली आहे.

| अ.क्र. | तालुका | गावे | कुटुंब संख्या | स्थलांतर करणारी कुटुंबे | | | स्थलांतर न करणारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | उन्हाळा | हिवाळा | एकूण | एकूण कुटुंबे |
| १) | अहेरी | ३ | २५ | २ | २ | ४ | २१ |
| २) | सिरोंचा | २ | १७ | ० | ० | ० | १७ |
| ३) | भामरागड | ६ | २३ | ० | ० | ० | २३ |
| एकूण :- | | ११ | ६५ | २ | २ | ४ | ६१ |



## ३.८ घरांची स्थिती

स्थलांतर रोखणारी मोठी महत्वाची बाब म्हणजे निवारा. बव्हंशी आदिम कातकरी समाज हा कच्च्या कुडाच्या भिंती असलेल्या झोपडीत रहाणारा होता. त्यामुळे तो जिथे जाईल तिथे नव्याने घर उभारु शकत होता. त्यामुळे कायमस्वरुपी निवाऱ्याच्या सुविधेमुळे प्राप्त होणाऱ्या स्थैर्यास तो पराङमुख झाला होता. निवाऱ्याची गरज भागविण्यासाठी शासनाने आदिवासी विकास विभागामार्फत व इंदिरा आवास योजनेमार्फत पक्की घरे बांधून देण्याची योजना राबविली.

### १) कातकरी

योजनेमार्फत पक्की घरे बांधून दिलेल्या आदिम जमातीच्या समाजापैकी कातकरींच्या निवाऱ्याची अवस्था खालील तक्त्यावरुन समजेल.

| अ.क्र. | तालुका | घरांची स्थिती | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण कुटुंब/घरे | कच्चे | पक्के | | पक्क्या घरांची % |
| | | | | स्वतःचे | शासनाचे | |
| १) | जव्हार | ५२ | १३ | ५ | ३४ | ७५ |
| २) | मोखाडा | ३ | ० | १ | २ | १०० |
| **एकूण :- (रायगड)** | | **५५** | **१३** | **६** | **३६** | **७६** |
| १) | खालापूर | २९ | १३ | ३ | १३ | ~~४५~~ ५५ |
| २) | कर्जत | ३१ | ८ | ४ | १९ | ७४ |
| **एकूण :- (ठाणे)** | | **६०** | **२१** | **७** | **३२** | **६५** |
| **एकूण कातकरी** | | **११५** | **३४** | **१३** | **६८** | **७०** |

वरील तक्त्यावरुन आदिम जमातीपैकी कातकरी समाजाच्या निवाऱ्याबाबत असे दिसते की, खालापूर तालुक्यातील चार गावातील पाहणी केलेल्या एकूण २९ कुटुंबांच्या २९ घरांपैकी १३ घरे अद्यापही कच्ची आहेत. हे प्रमाण ४५% आढळते. कर्जत तालुक्यात पाहणी केलेल्या ३१ कुटुंबांपैकी आठ घरे कच्ची असून हे प्रमाण २६ टक्के आहे. ३० % कातकरी अजून कायम स्वरूपी निवाऱ्यासाठी वंचित आहेत. व खालापूर तालुक्यात हे प्रमाण लक्षणीय आहे. त्या मानाने ठाणे जिल्ह्यातिल निवाऱ्याची स्थिती ठीक आहे. अर्थात कातकऱ्यांच्या पक्क्या घरांपैकी ८४% घरे शासनाने बांधून दिली आहेत.

## २) कोलाम

कोलाम समाजाच्या पाहणी केलेल्या किनवट व माहूर तालुक्यातील ५० लाभार्थी कुटुंबांच्या घरांच्या स्थितीचा आढावा खालील तक्त्यात घेण्यात आला आहे.

| अ.क्र. | तालुका | कुटुंब संख्या | कच्चे | पक्के | | पक्क्या घरांची % |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | स्वतःचे | शासनाचे | |
| १) | किनवट | २९ | ३ | ० | २६ | ९० |
| २) | माहूर | २१ | १ | २ | १८ | ९५ |
| | एकूण | ५० | ४ | २ | ४४ | ९२ |

५० कुटुंबापैकी केवळ चार कुटुंबांची घरे कच्ची असून, उरलेल्या ४६ कुटुंबांची घरे पक्क्या स्वरुपाची आहेत. परंतु हया ४६ पक्क्या घरांपैकी फक्त दोन घरेच मालकांनी स्वतः बांधली असून उरलेली ४४ पक्की घरे शासनाने विविध योजनांतून दिलेली आहेत. हयाचा परिणाम म्हणून हया समाजात स्थलांतराचे प्रमाण फारच कमी आहे.

पक्क्या स्वरुपाच्या घरांमुळे त्यांना कायम स्वरुपाचा निवारा उपलब्ध झाला आहे. मात्र ही परिस्थिती केवळ शासनाने दिलेल्या योजनांमुळेच साध्य झाली आहे अन्यथा हया समाजाची स्वतःची पक्के घरे बांधण्याची आर्थिक कुवत नाही.

## ३) माडीया

माडीया जमातीच्या पाहणी केलेल्या एकूण ६५ लाभार्थ्यांपैकी ५२ कुटुंबांची घरे पक्क्या स्वरुपाची असून १३ घरे कच्ची आहेत. म्हणजेच ८०% घरे पक्क्या स्वरुपाची आहेत. ५२ पक्क्या घरांपैकी २० घरे शासनाने विविध योजनांतून बांधून दिली आहेत. भामरागड प्रकल्पात पाहणी केलेल्या २३ घरांपैकी १६ घरे (७०%) पक्क्या स्वरुपाची असून फक्त १९ % घरे स्वतःच्या मालकीची आहेत. व ८१% घरे शासनाकडून देण्यात आलेली आहेत.


अहेरी व सिरोंचा प्रकल्पातील भेटी दिलेल्या ४२ कुटुंबांपैकी ३६ घरे (८६%) पक्की असून ४७% घरे स्वतःची आहेत व ५३% घरे शासनाकडून मिळालेली आहेत. म्हणजेच स्वतःच्या व शासनाकडून मिळालेल्या पक्क्या घरांचे प्रमाण साधारणपणे १:१ असे आहे. गर्कापेठा हया गावात

शासनाकडून दिलेल्या घरांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ८४% असून झिंगानूरमध्ये हे प्रमाण ३५ % आहे.

घरांसंबधीची स्थिती खालील तक्त्यात दिलेली आहे.

## राहत्या घराची स्थिती

| अ.क्र. | तालुका | कुटुंब संख्या | कच्चे | पक्के | | पक्क्या घरांची % |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | स्वतःचे | शासनाचे | |
| १) | अहेरी | २५ | ४ | ९ | १२ | ८४ |
| २) | सिरोंचा | १७ | २ | ८ | ७ | ८८ |
| ३) | भामरागड | २३ | ७ | ३ | १३ | ७० |
| | **एकूण :-** | **६५** | **१३** | **२०** | **३२** | **८०** |



## ३.९ पशुधन

**'पशवो वै धनम !'** असे पशुधनाबाबत म्हटलेले आहे. कातकरी समाजाच्या पाहणी केलेल्या ११५ ~~लाभार्थी पैकी ६०~~ लाभार्थ्यांच्या पशुधनाची आकडेवारी खाली दिलेली आहे.

### १) कातकरी

| अक्र. | तालुका | एकूण कुटुंब/घरे | पशुधन | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गाई | म्हैस | रेडा | बैल | शेळया | कोंबडया | इतर |
| १) | जव्हार | ५२ | १८ | ८ | - | ३१ | ४४ | ५२ | ० |
| २) | मोखाडा | ३ | - | - | - | १ | - | - | ० |
| **एकूण (ठाणे)** | | **५५** | **१८** | ~~२९~~८ | **-** | **३२** | **४४** | **५२** | **०** |
| १) | खालापूर | ३१ | ८ | ६ | ० | ८ | ७ | ४६ | ० |
| २) | कर्जत | २९ | ३ | ० | ० | ० | २ | १२ | ० |
| **एकूण (रायगड)** | | **६०** | **११** | **६** | **०** | **८** | **९** | **५८** | **०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की; रायगड जिल्हयातील खालापुर व कर्जत तालुक्यातील ६० कुटुंबांकडे मिळून ११ गाई, ६ म्हशी, ८ बैल, ९ शेळया व ५८ कोंबडया आहेत. हयापैकी फक्त दोन गाई व दोन म्हशी दुभत्या आहेत म्हणजे **१५कुटुंबांमध्ये १ दुभते जनावर** असे प्रमाण असून साधारणआठ कुटुंबांकडे मिळून एक बैल आहे. कोंबडयांचे प्रमाण घरपट एक कोंबडी असे पडते.

म्हैस वाटप या योजनेतून हया जिल्हयात चार म्हशी देण्यात आल्या आहेत म्हणजे योजनेपूर्वी फक्त दोनच कुटुंबांकडे म्हशी होत्या. रायगड जिल्हयात सोळा भूधारक आहेत व शेतीच्या कामासाठी लागणाऱ्या बैलांची संख्या ८ म्हणजे २ : १ प्रमाण आहे. **एका शेतकऱ्याला दोन बैलांची गरज असताना इथे दोन शेतकऱ्यांना मिळून एक बैल असे व्यस्त प्रमाण आहे.** त्यामुळे त्यांना शेती व्यवसाय करणे अवघड जात आहे.

ठाणे जिल्हयातील जव्हार व मोखाडा या दोन तालुक्यात मिळून १८ गाई, ८ म्हशी, ३२ बैल, ४४ शेळया व ५२ कोंबडया आहेत. ठाणे जिल्हयात तीस भूधारक असून, त्यांच्याकडे बत्तीस बैल आहेत. ही स्थिती रागयड जिल्हयापेक्षा बरी आहे असे म्हणता येईल. मात्र कातकरी समाजाकडे असलेल्या नगण्य कोंबडया विचारात घेता, कुक्कुटपालन हा चरितार्थाला हातभार लावणारा व्यवसाय म्हणता येणार नाही.

## २) कोलाम

कोलाम जमातीच्या पाहणी केलेल्या ५० लाभार्थ्यांपैकी असलेल्या पशुधनाची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अक्र. | तालुका | कुटुंब | पशुधन | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गाई | म्हैस | बैल | शेळया | कोंबडया | डुकरे |
| १) | किनवट | २९ | ३४ | ४ | ८ | ६३ | १३ | ० |
| २) | माहूर | २१ | ४ | ० | ६ | ११४ | १६ | ० |
| | **एकूण** | **५०** | **३८** | **४** | **१४** | **१७७** | **२९** | **०** |

वरील माहितीवरुन असे लक्षात येते की, कोलाम समाजाजवळ पशुधनाचेही ऐश्वर्य नाही. घरपट एक सुध्दा गाय, म्हैस असे दुभते जनावर नाही. १६ भूधारकांकडे मिळून १४ बैल आहेत. त्यामुळे शेती करण्यासही अडचणी येतात. कोंबडयांचे प्रमाण घरपट एक देखील नाही; आहेत त्या फक्त शेळया व गाई . त्यादेखील गाई व शेळया शासकीय योजनेतून मिळाल्या आहेत.

## ३) माडीया

माडीया जमातीच्या पाहणी केलेल्या एकूण ६५ लाभार्थ्यांकडे असलेल्या पशुधनाची माहिती खालील तक्त्यात दर्शविली आहे.

| अक्र. | तालुका | कुटुंब संख्या | पशुधन | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गाई | म्हैस | रेडे | बैल | शेळया | कोंबडया | डुकरे |
| १) | अहेरी | २५ | | ४५ | ० | ५८ | ८३ | ४६ | ० |
| २) | सिरोंचा | १७ | | ५१ | ० | ६१ | १०५ | ४२ | ० |
| ३) | भामरागड | २३ | | ५८ | (२१रेडे) १५ | ६५ | १२६ | ३७ | ० |
| | **एकूण** | **६५** | | **१५४** | **१५** | **१८४** | **३१४** | **१२५** | **०** |

वरील माहिती वरुन असे लक्षात येते की, भामरागड प्रकल्पातील २३ कुटुंबातील पशुधनाची आकडेवारी पाहीली असता जवळपास घरपट २ गाई, १ म्हैस, १ रेडा, ३ शेळया, ३ कोंबडया व ३ बैल असे पशुधन असे असल्याचे समजते. प्रत्येक घरी ७-८ मोठी जनावरे असल्याचे दिसते.

तर अहेरी व सिरोंचा प्रकल्पातील ४२ कुटुंबात घरपट १ गाय, २ बैल, १ शेळी, व २ कोंबडया असल्याचे दिसते. येथे एका कुटुंबाकडे साधारण तीन मोठी जनावरे आहेत.

भामरागडमध्ये अहेरी व सिरोंचा प्रकल्पापेक्षा पशुधनाची संपत्ती जास्त आहे. एकूणच गडचिरोली जिल्हयात फिरताना गुरांचे कळपच्या कळप इकडून तिकडे फिरतांना दिसतात. पण बरीचशी जनावरे ना दुधाच्या ना कामाच्या उपयोगाची आहेत.

एकतर विशेष बाब म्हणजे माडीया समाजात गाईचे दुध काढणे निषिध्द् मानले जाते. त्यामुळे गाई असल्या तरी त्यांचा उपयोग केवळ पैदाशीसाठी होतो. गो-हे व कालवडीतील गोऱ्हे मोठे झाले की ते शेतीसाठी वापरले जातात व कालवडी पुन्हा पैदाशीसाठी.चांगल्या जातीच्या, धष्टपुष्ट बैलांच्या पैदाशीसाठी त्यांच्याकडे काही विशेष लक्ष दिले जात नाही. अशी खास जोपासना करावी लागते अशी जाणही नाही. चांगले खादय, औषधपाणी व चांगल्या वाणांपासून पैदास अशी कोणतीच बाब आवर्जून केली जात नसल्याने, पैदास झालेली पुष्कळ जनावरे दुर्बल,अशक्त व मरतुकडीच निपजतात व निरुपयोगी तरुन भाकड जनावरांचे कळप निपजतात. **थोडक्यात मोजायला नग आहेत पण उपयोगाच्या दृष्टीने महत्व नाही.**

*******

## ३.१० व्यवसायानुसार वर्गीकरण

### १) कातकरी

उदरनिर्वाह चालविण्यासाठी कातकरी लोक शेती, शेतमजूरी, मजूरी, जंगलवनौपज गोळा करणे, मासेमारी व नोकरी इत्यादी व्यवसाय करतात. अल्प भूधारणा, भूमीहीन समाज, निरक्षरांची बहुलता व भांडवलाचा अभाव हयामुळे शेती, दुकानदारी व नोकरी हयात गुंतलेला कातकरी समाज अल्पसंख्य आहे. रायगड व ठाणे जिल्हयातील पाहणी केलेल्या ११५ लाभार्थ्यांपैकीचे व्यवसायानुसार वर्गीकरण खाली दिले आहे.

| तालुका | कु क्र | कूटूंब सदस्य | शेती | | शेत मजूरी | | मजूरी | | व्यवसाय | | नोकरी | | लाकूडफाटा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुख्य | दुय्यम | मुख्य | दुय्यम | मुख्य | दुय्यम | मुख्य | दुय्यम | मुख्य | दुय्यम | मुख्य | दुय्यम |
| १)खालापूर | २९ | | ६ | २ | २ | १२ | १६ | ५ | १ | १ | ० | ० | - | ६ |
| २)कर्जत | ३१ | | ३ | - | ६ | ८ | २१ | १० | १ | - | ० | ० | - | - |
| **रायगड :** | **६०** | | **९** | **२** | **८** | **२०** | **३७** | **१५** | **२** | **१** | **०** | **०** | **-** | **६** |
| १)जव्हार | ५२ | | २३ | ६ | २३ | २२ | ३ | १४ | १ | ३ | २ | १ | ० | ० |
| २)मोखाडा | ३ | | ० | १ | १ | १ | १ | १ | १ | - | ० | ० | ० | ० |
| **ठाणे :** | **५५** | | **२३** | **७** | **२४** | **२३** | **४** | **१५** | **२** | **३** | **२** | **१** | **०** | **०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, ठाणे जिल्हयातील सर्वेक्षण केलेल्या ५५ कुटुंबापैकी ~~२२~~ २३ कुटुंबांचा मुख्य व्यवसाय शेती असून, २४ कुटुंबांचा मुख्य व्यवसाय शेतमजूरी आहे. शेतमजूरी व्यतिरिक्त इतर मजूरी हा मुख्य व्यवसाय करणारी फक्त चारच कुटुंबे आहेत. नोकरी हा मुख्य व्यवसाय असलेली दोन कुटुंबे आहेत तर अन्य म्हणजे दुकान इत्यादी हा मुख्य व्यवसाय दोन कुटुंबाचा आहे.

शेती हया मुख्य व्यवसायासाठी लागणारी जमीन व नोकरीसाठी आवश्यक असणारे शिक्षण व दुकानदारी इत्यादी व्यवसायासाठी आवश्यक असणारे भांडवल हया बाबींच्या अभावी शेती, नोकरी व इतर व्यवसाय हे मुख्य व्यवसाय करणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे. ४०% कुटुंबांचा मुख्य व्यवसाय शेती असला तरी उरलेली ६०% कुटुंबे जमिनीच्या अभावी शेतमजूरीच करतात.

रायगड जिल्हयातील खालापूर व कर्जत तालुक्यातील सर्व्हे केलेल्या ६० कुटुंबांपैकी फक्त ९ कुटुंबे शेती हा मुख्य व्यवसाय करतात. हे प्रमाण फक्त १५% आहे. ३७ कुटुंबांचा मजूरी व ८ कुटुंबांचा

शेतमजूरी हा मुख्य व्यवसाय आहे. म्हणजेच ७५% कुटुंबांचा उदरनिर्वाह मजूरीवरच चालतो. महिन्यातील १२ ते १५ दिवस रोजगार उपलब्ध होतो. शेतमजूरीसाठी माणशी सरासरी रोजंदारीने रु. ४० ते ६० चे दरम्यान रोज मिळतो. अशा स्थितीत त्यांचा जो मुख्य व्यवसाय आहे तोच त्यांच्या राहणीमानाचा व आर्थिक स्थितीचा निर्देशक आहे.

## २) कोलाम

कोलाम जमातीच्या पाहणी केलेल्या ५० लाभार्थी कुटुंबांचे व्यवसायानुसार वर्गीकरण खालील तक्त्यात केले आहे.

| अ.क्र. | तालुका | गावे/कूसं | व्यवसाय | | शेती | | शेम | | मजूरी | | दुग्ध | | लाकूड | | नोकरी | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मु | दु | मु | दु | मु | दु | मु | दु | मु | दु | मु | दु | मु | दु | मु | दु |
| १) | किनवट | (५) २९ | २ | ७ | | १ | ६ | २ | ४ | ४ | ० | ० | ० | १ | १ | ० | २९ | १५ |
| २) | माहूर | (४) २१ | ० | १ | ८ | १ | ५ | १ | ७ | ६ | ० | १ | १ | ३ | ० | ० | २१ | १३ |
| | **एकूण** | **(९) ५०** | **२** | **८** | **१४** | **२** | **२१** | **३** | **११** | **१०** | **०** | **१** | **१** | **४** | **१** | **०** | **५०** | **२८** |

वरील तक्त्याकडे नजर टाकली असता असे निदर्शनास येते की, किनवट व माहूर तालुक्यातील कोलाम या आदिम जमातीच्या उदरनिर्वाहाचे मुख्य साधन शेतमजूरी व मजूरी हेच आहे. भूमीहीनांचे प्रमाण मोठे असल्याने तसेच काही भूधारकांची जमीन ही वरकस खडकाळ माळरान असल्याने शेती हा या कुटुंबांचा मुख्य व्यवसाय होऊ शकत नाही.

शेतमजूरी , शेती व मजूरीनंतर उपजीविकेच्या साधनांसाठी ही कोलाम कुटुंबे त्यांच्या परंपरागत बांबू विणकाम हया व्यवसायाकडे वळलेली दिसतात व हया व्यवसायांतर्गत एकूण १२ कुटुंबांनी हा व्यवसाय दुय्यम म्हणून स्वीकारला आहे.

फक्त एकाच कुटुंबात दुग्धव्यवसाय हा तीन नंबरचा व्यवसाय म्हणून करण्यात येत असून, नोकरीवर गुजराण करणारे फक्त एकच कुटुंब आहे. माध्यमिक शिक्षणाच्या अभावामुळे नोकरी करण्यास हा समाज सक्षम नाही.

आकडेवारीत बोलायचे झाले तर ४२% कुटुंबे शेतमजूरी हा मुख्य व्यवसाय करत असून, २८% कुटुंबे शेती हा मुख्य व्यवसाय करतात. २२% कुटुंबे मजूरी हया मुख्य व्यवसायावर चरितार्थ चालवितात व २४% कुटुंबे बांबू विणकाम करतात.

शेतमजूरी शेती व मजूरी महिन्यात जास्तीत जास्त १५ दिवस उपलब्ध होऊ शकते. बारमाही रोजगार उपलब्ध नसल्याने **मनुष्यबळ वाया जाते.**

**३) माडीया**

माडीया जमातीच्या पाहणी केलेल्या ६५ लाभार्थ्यांपैकी भामरागड प्रकल्पातील २३ कुटुंबे आहेत. व त्यांच्यापैकी २१ कुटुंबे शेती हा मुख्य व्यवसाय करतात हे प्रमाण ९१% आहे. भामरागडमध्ये एक कुटुंब मजूरी हा मुख्य व्यवसाय करत असून एका कुटुंबांचा व्यवसाय आहे. भामरागड प्रकल्पात शेतमजूरी हा दुय्यम व्यवसाय म्हणून पाच कुटुंबांनी स्वीकारला असून, तीन कुटुंबे मजूरी करतात. नोकरी मात्र फक्त एकाच कुटुंबात केली जाते.

अहेरी व सिरोंचा प्रकल्पातील पाहणी केलेल्या ४२ कुटुंबांपैकी ३७ कुटुंबांचा शेती हा मुख्य व्यवसाय असून, मजूरी मुख्य व्यवसाय म्हणून तीन कुटुंबे करतात. एका कुटुंबाकडून शेतमजूरीही मुख्य व्यवसाय म्हणूनच केली जाते व ४२ कुटुंबांपैकी फक्त एका कुटुंबांची उपजीविका नोकरीवर चालते. थोडक्यात माडीया जमातीच्या ६५ कुटुंबातील ५८ (८९%) कुटुंबे शेतीवरच जगतात व जोडधंदा म्हणून शेतमजूरी, मजूरी वगैरे करतात. नोकरी करण्याचे प्रमाण ३% इतके अत्यल्प आहे.शेती हा मुख्य व्यवसाय असल्याने माडीया स्थलांतर करत नाहीत व एकाच ठिकाणी राहण्यामुळे स्थैर्याचा लाभही मिळतो.

| अ.क्र. | तालुका | व्यवसाय | | शेती | | शेम | | मजूरी | | दुग्ध | | लाकूड | | नोकरी | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मु | दु | मु | दु | मु | दु | मु | दु | मु | दु | मु | दु | मु | दु | |
| १) | अहेरी | ० | १ | २० | ५ | १ | २ | ० | ० | ३ | ८ | ० | ० | १ | ० | २५ |
| २) | सिरोंचा | ० | ० | १७ | ० | ० | १२ | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १७ |
| ३) | भामरागड | १ | २ | २१ | १ | ० | ५ | ० | ० | १ | ३ | ० | ० | ० | १ | २३ |
| | एकूण | १ | ३ | ५८ | ६ | १ | १९ | ० | ० | ४ | १२ | ० | ० | १ | १ | ६५ |

*******

## ३.११ देण्यात आलेल्या योजना

आदिम कातकरी जमातीला त्यांची आर्थिक स्थिती सुधारावी म्हणून १००% अनुदानावर अनेक योजना राबविण्यात आल्या.

घरकुल, लघुउपसा, विहीरीची खोली वाढविणे, रोपवाटीका, लोहार साहित्य पुरविणे, विहीर, तेलपंप, घरघंटी, शेळीवाटप, चिखलणी यंत्र, दुधाळ जनावरे वाटप, शेवगा लागवड, महिलांना प्रशिक्षण, वनौषधींची नर्सरी प्रशिक्षण, संयुक्त वनव्यवस्थापन, भाजीपाला किट, चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या आदिवासी कुटुंबांना मदत हया योजना ठाणे व रायगड जिल्हयातील आदिम आदिवासी जमातीला देण्यात आल्या.

**१) कातकरी**

| अक्र. | योजनेचे नांव | जिल्हा- ठाणे | | | जिल्हा - रायगड | | | कातकरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जव्हार | मोखाडा | ठाणे एकूण | खालापूर | कर्जत | रायगड एकूण | एकूण |
| १) | घरकुल | १८ | १ | १९ | - | - | - | १९ |
| २) | लघुउपसा | ६ | - | ६ | - | - | - | ६ |
| ३) | विहीरीची खोली | ४ | - | ४ | - | - | - | ४ |
| ४) | रोपवाटीका | ४ | - | ४ | - | - | - | ४ |
| ५) | लोहार साहित्य | १ | - | १ | - | - | - | १ |
| ६) | किराणा | १ | २ | ३ | - | - | - | ३ |
| ७) | नवी विहिर खोदाई | ४ | - | ४ | - | - | - | ४ |
| ८) | तेलपंप | ३ | - | ३ | १ | - | १ | ४ |
| ९) | घरघंटी | १ | १ | २ | - | - | - | २ |
| १०) | शेळीगट | २ | - | २ | - | ४ | ४ | ६ |
| ११) | चिखलणी यंत्र | २ | - | २ | - | - | - | २ |
| १२) | दुधाळ जनावरे | ५ | - | ५ | ४ | - | ४ | ९ |
| १२) | शेवगा लागवड | - | - | - | २ | - | २ | २ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४) | मश्रूम लागवड प्रशिक्षण | - | - | - | ११ | - | ११ | ११ |
| १५) | वनौषधी लागवड | - | - | - | ११ | - | ११ | ११ |
| १६) | संयुक्त वनव्यवस्थापन | - | - | - | - | ५ | ५ | ५ |
| १७) | भाजीपाला कीट | - | - | - | - | १० | १० | १० |
| १८) | चक्रीवादळ मदत | - | - | - | - | १० | १० | १० |
| १९) | उपसा जलसिंचन | - | - | - | - | २ | २ | २ |
| | एकूण : - | ५७ | ४ | ५५ | २९ | ३१ | ६० | ११५ |

**२) कोलाम**

आदिम जमातींपैकी शासनामार्फत देण्यात आलेल्या लाभाच्या योजनांपैकी नांदेड जिल्हयातील किनवट व माहूर तालुक्यातील कोलाम जमातीच्या पाहणी केलेल्या ५० कुटुंबांनी खालील योजनांचा लाभ घेतला.

| अक्र. | तालुका | गावांची संख्या | कुटुंब संख्या | घरकुल | पीठगिरणी | गाई | शेळया | गॅस | संगणक | जमीन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | किनवट | ५ | २९ | ४ | ० | १० | १३ | २ | ० | ० |
| २) | माहूर | ४ | २१ | ० | १ | १ | ११ | ० | १ | ७ |
| **एकूण :** | | **९** | **५०** | **४** | **१** | **११** | **२४** | **२** | **१** | **७** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, सन् २००७-०८ या वर्षात विशेष करुन गाई वाटप व शेळया वाटप ही योजना २५ लाभार्थींना देण्यात आली. माहूर तालुक्यातील सात लाभार्थींना जमीन वाटप करण्यात आली असून; एका लाभार्थ्याला संगणक देण्यात आला आहे. घरकुल ही योजना सन् २००३-०४ या वर्षीही देण्यात आली आहे. परंतु सन् २००६-०७ मध्ये मिळालेल्या हया योजनेत चार लाभार्थींना लाभ देण्यात आला आहे. गॅस वाटप ही योजना दिलेल्या लाभार्थींची यादी प्रकल्प कार्यालय किनवट यांनी दिली असली तरी वास्तवात **किनवट तालुक्यातील मांडवा गावातील एक लाभधारक वगळता कोणालाही गॅस देण्यात आलेला नाही असे निदर्शनास आले.** त्यामुळे त्या लाभार्थ्यांची कुटुंबपत्रके भरण्यात आली नाहीत.

## ३) माडिया

आदिम जमातींना शासनाकडून देण्यात आलेल्या योजनांपैकी गडचिरोली जिल्हयातील भामरागड, अहेरी व सिरोंचा प्रकल्पातील पाहणी केलेल्या ६५ लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या योजनांची आकडेवारी खालील तक्त्यात पाहता येईल

| अ. क्र. | विविध योजनांचा लाभ दिलेली कुटुंबे | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | तालुका | गावे (कुटुंब संख्या) | घर कुल | पीठ गिरणी | गाई/ म्हेस वाटप | शेळी वाटप | संगणक | मिरची कांडप | गो भत्ता | नर्सरी | ऑइल इंजिन | वराह पालन | उपसा जल सिंचन | पीव्हीसी | सायकल | नवी-विहीर | अतिवृष्टी | वाहन चालक प्रशिक्षण | मत्स्यबीज | बांबू प्रशिक्षण | साऊंड सिस्टीम |
| १. | अहेरी | ३ (२५) | १० | | | | १ | | | | | ६ | | ३ | २ | १ | १ | १ | | | |
| २. | सिरोंचा | २ (१७) | ३ | | | | | २ | | | | १ | | १ | २ | १ | | | १ | ५ | १ |
| ३. | भामरागड | ६ (२३) | ९ | १ | २ | २ | ० | ० | ७ | २ | ३ | १ | १ | १ | | | | | | | |
| | एकूण | ११ (६५) | २२ | १ | २ | २ | १ | २ | ७ | २ | ३ | ८ | १ | ५ | ४ | २ | १ | १ | १ | ५ | १ |

३) माहीचा

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, भामरागड प्रकल्पातील निवडलेल्या २३ कुटुंबांपैकी सन् २००२-२००३ पासून ९ लाभार्थींना घरकुल योजना देण्यात आली. ७ लाभाथी कुटुंबांना मुलींच्या शाळेतील उपस्थितीशी संलग्नित असलेली प्रोत्साहन भत्ता ही योजना देण्यात आली. नर्सरी, म्हैस वाटप, व शेळी गट वाटप हया योजनांचा फायदा प्रत्येकी दोन लाभार्थ्यांना देण्यात आला. तर ऑईल इंजिनचा पुरवठा ही योजना तीन कुटुंबांना देण्यात आली. हया व्यतिरिक्त उपसासिंचन, वराहपालन, पी.व्ही.सी. पाईप, पीठ गिरणी इत्यादी योजनेचा लाभ दिलेला प्रत्येकी एक लाभार्थी आहे.

अहेरी व सिरोंचा प्रकल्पात वराहपालन योजना ७ लाभार्थींना, घरकुल १३ लाभार्थींना, नविन विहीर २ लाभार्थींना संगणक प्रशिक्षण, अतिवृष्टीमध्ये मदत, वाहन प्रशिक्षण, साऊंड सिस्टीम हया योजना प्रत्येकी १ लाभार्थीला देण्यात आले तसेच बांबू प्रशिक्षण ही योजना ५ लाभार्थींना देण्यात आली असून मिरची कांडप ही योजना २ लाभार्थींना देण्यात आली. मत्स्य-शेती ही योजना १ लाभार्थीला देण्यात आली आहे.

*******

## ३.१२ योजनांच्या माहितीचा स्त्रोत

शासनाच्या आदिम जमातीच्या लाभार्थ्यांसाठी राबविवण्यात येणाऱ्या योजनांची लाभार्थींना फारशी माहिती नाही. शासनाच्या योजनांना पुरेशी प्रसिध्दी दिली जात नाही तसेच शासनाचे गावा-गावातील तलाठी, ग्रामसेवक इत्यादी कर्मचारी योजनांचा प्रचार करत नाहीत. आदिम जमातींच्या समाजापर्यंत या योजना पोचत नसल्यामुळे लाभ घेण्यास ते असमर्थ ठरतात. योजनांच्या फायद्याविषयी साधक बाधक चर्चा होत नाही.

बऱ्याचशा योजनांची माहिती लाभार्थ्यांना कार्यकर्त्यांमार्फत व क्वचित ठिकाणी सरपंचामार्फत मिळते. फार कमी लाभार्थ्यांची प्रकल्प कार्यालयात ये-जा असते. ते प्रकल्प कार्यालयाच्या थेट संपर्कात नसतात. याचाच फायदा आदिम जमातीच्या समाजातील कार्यकर्ते घेतात व स्वतःच्या फायदयाच्या योजना गावात राबविण्यासाठी प्रकल्प कार्यालयावर दबाव आणून त्यांना उद्युक्त करतात. अर्थात प्रकल्प कार्यालयास ही पुरेशा मनुष्यबळा अभावी व आवश्यक सोई-सुविधा अभावी गावागावात, दुर्गम पाडयात संपर्क साधणे अवघड असते. तसेच आदिम जमातीच्या बोली-भाषा अवगत नसल्याने लाभार्थ्यांशी संवाद साधणे सहज सुलभ नसते हया पार्श्वभूमीवर प्रकल्प कार्यालयेही कार्यकर्त्यांना हाताशी धरुन योजना राबवू पाहते.

**या परिस्थितीचे आकलन असलेले कार्यकर्ते दोन्ही बाजूंच्या अडचणींचा गैरफायदा घेतात. परिणामी लाभार्थी योजनांच्या लाभापासून वंचित रहातात.**

### १) कातकरी

| अ.क्र. | तालुका | योजनेची माहिती कोणाकडून मिळाली याचे वर्गीकरण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कुटुंब संख्या | कार्यकर्ता | ग्रामसेवक | तलाठी | प्रकल्प कार्यालय | सरपंच | इतर |
| १) | जव्हार | ५२ | १० | - | ० | ३६ | २ | ८ |
| २) | मोखाडा | ३ | १ | १ | ० | ० | ० | १ |
| **एकूण (ठाणे)** | | **५५** | **१३** | **२** | **०** | **३६** | **२** | **७** |
| १) | खालापूर | २९ | ७ | १ | ० | १५ | ३ | ६ |
| २) | कर्जत | ३१ | ९ | २ | ० | १९ | १ | २ |
| **एकूण (रायगड)** | | **६०** | **१६** | **३** | **०** | **३४** | **४** | **८** |

वरील तक्त्यावरून कातकरी लाभार्थ्यांना योजनेची माहिती प्रकल्प कार्यालयाकडून व कार्यकर्त्यांकडूनच मिळते असे दिसून येईल. ग्रामसेवक वा तलाठी यांचे या कामी फ़ारसे सहकार्य मिळते असे दिसत नाही.

## २) कोलाम

| योजनांच्या माहितीचा स्त्रोत | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | तालुका | कुटुंब संख्या | कार्यकर्ता | ग्रामसेवक | तलाठी | प्रकल्प अधिकारी | सरपंच | इतर |
| १) | किनवट | २९ | ५ | ३ | ० | ० | १४ | ० |
| २) | माहूर | २१ | १६ | १ | ० | ५ | ० | ० |
| | एकूण | ५० | २१ | ४ | ० | ५ | १४ | ० |

कोलामांच्या योजनांच्या माहितीच्या स्त्रोताकडे नजर टाकली असता ह्या कामात सरपंचांचाही लक्षणीय सहभाग असल्याचे दिसते. तलाठी मात्र ह्या कामात सहभागी होत नसल्याचे सार्वत्रिक चित्र येथेही दिसते.

वरील तक्त्यावरुन आदिम जमातीच्या पाहणी केलेल्या लाभार्थ्यांना योजनांची माहिती कोणाकडून मिळाली याची आकडेवारी उपलब्ध होते.

त्यावरुन मोठ्या प्रमाणात लाभार्थींना योजनांची माहिती कार्यकर्त्यांकडून मिळाल्याचे स्पष्ट होते तसेच ग्रामसेवक व तलाठी हयांचा हया कामातील नगण्य सहभाग निदर्शनास येतो.

## ३) माडीया

| योजनांच्या माहितीचा स्त्रोत | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अक्र. | तालुका | कुटुंब संख्या | कार्यकर्ता | ग्रामसेवक | तलाठी | प्रकल्प अधिकारी | सरपंच | इतर |
| १) | अहेरी | २५ | ४ | ० | ० | १७ | १ | ३ |
| २) | सिरोंचा | १७ | ९ | १ | ० | ७ | २ | २ |
| ३) | भामरागड | २३ | १२ | ० | ० | ९ | १ | २ |
| | एकूण | ६५ | २५ | १ | ० | ३३ | ४ | ७ |

माडीयांना माहिती मिळण्याबाबतच्या परिस्थितीचा विचार करता, अहेरी तालुक्यात लाभार्थी मोठ्या प्रमाणात प्रकल्प कार्यालयावर अवलंबून आहेत असे दिसते. मात्र सिरोंचा व भामरागड प्रकल्पात लाभार्थ्यांना माहिती देण्याचे कामी कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतल्याचे लक्षात येते. येथेही तलाठी व ग्रामसेवकांसारखे कर्मचारी उदासीनच आहेत.

*******

## ३.१३ माहिती असलेल्या योजनांची संख्या

आदिम जमातींसाठी शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या योजनांपैकी किती योजनांची लाभार्थ्यांना माहिती आहे याची चौकशी सदर पाहणीत करण्यात आली व तेथेही निराशाजनक चित्र पुढे आले.

आदिम जमातींच्या लाभार्थ्यांना सध्या दिलेल्या योजनेबरोबर घरकुल सारख्या सर्वसाधारण योजनेचीच माहिती असलयाचे समजले. दोनपेक्षा अधिक योजनांची तपशीलवार माहिती लाभार्थ्यांना नाही व विशेष म्हणजे पाहणी करतांना असेही निदर्शनास आले की, लाभार्थी योजनांबाबत क्वचित अपवाद वगळता चौकशी देखील करत नाही .तेही उदासीनच असतात.

*******

# ३.१४ आर्थिक स्थिती

## १) कातकरी

योजनेपूर्वी व योजनेनंतरही कातकरी समाजाची आर्थिकस्थिती त्यांच्या किमान गरजा भागविण्या इतपतही नाही. रायगड जिल्हयातील खालापूर तालुक्यातील २९ कुटुंबांचे सर्व्हेक्षण केले असता;२९ पैकी ९म्हणजे ३१% कुटुंबांचे मासिक उत्पन्न दरमहा रु.१०००/- किंवा त्यापेक्षा कमी असल्याचे आढळले. १५ कुटुंबांचे मासिक उत्पन्न दरमहा रु.१००० ते १५००चे दरम्यान असून २९ पैकी केवळ ५ म्हणजे १५% कुटुंबांचे मासिक उत्पन्न दरमहा रु१५०० पेक्षा जास्त म्हणजे रु.१७००च्या आसपासआहे.म्हणजे सर्व्हे केलेल्या२९कुटुंबांपैकी जवळजवळ८३%कुटुंबे दारिद्र्यरेषेखालील आहेत.

कर्जत तालुक्यातील कातकरींची स्थितीही हयापेक्षा काही फारशी वेगळी नाही. ती खालापूर पेक्षा थोडी बरी आहे एवढेच. कर्जत तालुक्यात सर्व्हे केलेल्या ३१ कुटुंबांपैकी मासिक उत्पन्न रु.१०००/- किंवा त्यापेक्षा कमी असणाऱ्या कुटुंबांची संख्या ३ होती. मासिक उत्पन्न रुपये रु.१०००/- ते १५००/- च्या दरम्यान असलेली कुटुंबे १७ म्हणजे ५४% होती व ११म्हणजे ३५%कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु. १५००/- वा त्यापेक्षा जास्त म्हणजे रु.१७००/- च्या आसपास असल्याचे आढळले आहे. खालापूर मध्ये हया गटात १७% कुटुंबे असल्याचे आढळले.

### कातकरी जमातीची उत्पन्नानुसार वर्गवारी

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | कुटुंबे | मासिक प्राप्ती रु.१००० पेक्षा कमी | | रु. १००० पेक्षा जास्त व रु. १५०० पर्यंत | | रु. १५०० रु.किंवा रु १५०० पेक्षा जास्त | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | योजनेपूर्वी | योजनेनंतर | योजनेपूर्वी | योजने नंतर | योजनेपूर्वी | योजनेनंतर |
| १) | ठाणे | जव्हार | ५२ | ४० | ३१ | ११ | १८ | १ | ३ |
| | | मोखाडा | ३ | ३ | २ | ० | १ | ० | ० |
| **एकूण : ठाणे** | | | **५५** | **४३** | **३३** | **११** | **१९** | **१** | **३** |
| २) | रायगड | खालापूर | २९ | ९ | ९ | १५ | १५ | ५ | ५ |
| | | कर्जत | ३१ | ३ | ३ | १७ | १५ | ११ | १३ |
| एकूण : रायगड | | | ६० | १२ | १२ | ३२ | ३० | १६ | १८ |
| एकूण कातकरी | | | ११५ | ५५ | ४५ | ४३ | ४९ | १७ | २१ |

योजनेपूर्वी ठाणे जिल्ह्यात रु. १०००/- वा त्यापेक्षा कमी मासिक उत्पन्न असलेली४३ कुटुंबे होती. त्यांची योजनेनंतर आर्थिक स्थिती सुधारुनही ३३ कुटुंबांचे उत्पन्न हया गटाची सीमा ओलांडू शकले नाही. मासिक उत्पन्न रु. १०००/- ते १५००/- हया गटात योजनेपूर्वी ११ कुटुंबे होती. योजना मिळाल्यानंतरही हया गटातील कुटुंब संख्या १९ पर्यंत वाढली. योजनेपूर्वी उत्पन्न १५००/- पेक्षा जास्त असलेले एक कुटुंब होते. योजना मिळाल्याने तीन कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु. १५००/- पेक्षा वाढले.

| उत्पन्न वाढलेली कुटुंबे | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **तालुका** | **कुटुंब संख्या** | **उत्पन्न वाढलेली कुटुंबे** | **%** |
| १) | जव्हार | ५२ | २८ | ५४ |
| २) | मोखाडा | ३ | २ | ६७ |
| **एकूण : (ठाणे)** | | **५५** | **३०** | **५५** |
| १) | खालापूर | २९ | २ | ७ |
| २) | कर्जत | ३१ | ६ | १९ |
| **एकूण : (रायगड)** | | **६०** | **८** | **१३** |
| **एकूण कातकरी** | | **११५** | **३८** | **३३** |

योजना दिल्यानंतरही कातकऱ्यांच्याआर्थिक स्थितीत फारसा फरक पडला नाही असे वरील तक्त्यावरुन दिसून येते. खालापूर तालुक्यात केवळ दोन कुटुंबे वरच्या उत्पन्न गटात गेली आहेत. तर कर्जत तालुक्यात तीन कुटुंबे वरच्या उत्पन्न गटाकडे सरकली आहेत.

ठाणे जिल्हयातील जव्हार तालुक्यातील ५२ व मोखाडा तालुक्यातील ३ कुटुंबांचे सर्व्हेक्षण केले असता, सदर कुटुंबांचे मासिक उत्पन्नानुसार केलेले वर्गीकरण पाहीले असता रायगड जिल्हयापेक्षा ठाणे जिल्हयातील कातकरींची आर्थिक स्थिती हलाखीची आहे हेच स्पष्ट होते.

ठाणे जिल्हयात योजनेनंतरही ६०%ककुटूंबांचे उत्पन्न रु १००० मासीक प्राप्तीची मर्यादा ओलांडू शकलेले नाही.रायगड मध्ये हे प्रमाण फक्त २०%आहे.

रु १०००ते १५०० ह्या गटात ठाणे जिल्हयात ३५%ककुटूंबे आहेत तर रायगड मध्ये ह्या गटात ५०%ककुटूंबे आहेत.

योजनेनंतर दारीद्र्यरेषेच्या वर ठाणे जिल्हयातील केवळ ५% कु टूंबे पोचली असून रायगड जिल्हयात मात्र ३०%क्कुटूंबानी दारीद्र्यरेषा ओलांडली आहे.

मात्र योजनेनंतर ठाणे जिल्हयातील ३० म्हणजेच ५५% कुटुंबांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झ ाली आहे. ठाणे जिल्हयातील जव्हार तालुक्यातील न्याहाळे हया गावातील सर्वच्या सर्व म्हणजे ५ कुटुंबांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाली आहे. याच तालुक्यातील आखर गावातील १२ पैकी १० म्हणजे ८४% कुटुंबांची आर्थिक स्थिती योजनेनंतर सुधारली आहे. **मात्र स्थिती सुधारली म्हणजे ही कुटुंबे दारिद्रय रेषेच्यावर आली आहेत असा याचा अर्थ नाही.** आखर गावामधील १२ पैकी ३ म्हणजे २५% कुटुंबांचे मासिक उत्पन्न योजनेनंतर रु. १०००/- पेक्षा थोडेसे वाढले इतकेच.

न्याहाळे गावामधील एका कुटुंबाचे मासिक उत्पन्न मात्र योजनेनंतर ६८३ वरुन १६६० पर्यंत वाढले आहे. ही उल्लेखनीय बाब आहे.

योजना दिल्यानंतरही कातकर्‍यांच्याआर्थिक स्थितीत फारसा फरक पडला नाही असे वरील तक्त्यावरुन दिसून येते.

थोडक्यात योजनेचा कातकरींची हलाखीची स्थिती सुधारण्यास, ठाणे जिल्हयातील५५% कुटुंबांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाली हे पडताळून देखील, फ़ारसा काही हातभार लागलेला नाही असेच म्हणावे लागते. विपन्नावस्थेतील कातकरी समाज सर्वच दृष्टया मागासलेला आहे. त्यांची खपाटीला गेलेली पोटे व निझलेले डोळे त्यांच्या जीवनाचे दर्शन घडवितात.

हया सर्व आकडेवारी वरुन असे निर्दशित होते की, कातकरी हया आदिम आदिवासी जमातीसाठी राबविलेल्या योजना हया फायदेशीर ठरत आहेत. मात्र दारिंद्रयाच्या खाईत पडलेल्या कातकरी समाजाला त्या खाईतून बाहेर ओढून काढण्याइतके हया योजनांचे दोर बळकट नाहीत.

## २) कोलाम

आदिम जमातीपैकी कोलाम हया आदिम जमातीच्या केलेल्या पाहणीतून त्यांची आर्थिक विपन्नता दृष्टोत्पत्तीस आली. भूधारक नसल्याने महिन्यातून जास्तीत जास्त १५ दिवस ५० रुपये रोजाने मिळालेल्या मजूरीतून किंवा शेतमजूरीतून महिन्याकाठी माणशी रु. ७०० ते ७५० उत्पन्न मिळते. त्यातही महिलांच्या व पुरुषांच्या मजूरीत किमान २० रु. ची तफावत असते. त्यामुळे अर्धपोटी राहू लागू नये म्हणून पाच माणसांच्या कुटुंबातही २ ते ३ जणांना मजूरी करावीच लागते. हयासाठी शाळेय

शिक्षणही अनेकवेळा थांबविण्यात येते. मजूरी व शेतमजूरी बरोबरच हा समाज बांबू विणकाम करुन उपजीविका चालविण्याचा प्रयत्न करतो .परंतु हया मालाला आठवडी बाजाराशिवाय बाजारपेठ नसते व रोजच्या मीठ-मिरचीच्या खरेदीसाठी मिळेल त्या किंमतीला वस्तू विकण्याकडे कोलामांचा कल दिसतो. भांडवल गुंतवून ठेवणे त्यांच्या आर्थिक कुवती बाहेर आहे.

पाहणी केलेल्या ५० लाभार्थी कुटुंबांच्या उत्पन्नात योजनेमुळे झालेल्या वाढीबाबतची माहिती पुढील प्रमाणे आहे.

| उत्पन्न वाढलेली कुटुंबे | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | तालुका | कुटुंब संख्या | उत्पन्न वाढलेली कुटुंबे | % |
| १) | किनवट | २९ | २ | ७ |
| २) | माहूर | २१ | ८ | ३८ |
| | एकूण : | ५० | १० | २० |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, किनवट तालुक्यात २९ लाभार्थी कुटुंबांपैकी फक्त दोनच कुटुंबांचे उत्पन्न वाढलेले आहे तर माहूर तालुक्यातील २१ कुटुंबांपैकी ८ कुटुंबांचे उत्पन्न वाढलेले आहे. **म्हणजेच केवळ २०%कुटूबांचे उत्पन्न वाढले असून ८०% कुटूंबाना योजनेचा काहीही फ़ायदा मिळाला नाही.**

**कोलाम जमातीची उत्पन्नानुसार वर्गवारी**

| अ. क्र. | तालुका | लाभार्थी | मासिक प्राप्ती रु.१००० पेक्षा कमी | | मासिक उत्पन्न रु.१००० ते १५०० | | मासिक उत्पन्न रु.१५००ते १७०० | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्वी | नंतर | पूर्वी | नंतर | पूर्वी | नंतर |
| १) | किनवट | २९ | ३ | ३ | १३ | १३ | १३ | १३ |
| २) | माहूर | २१ | ३ | ३ | ८ | ४ | १० | १४ |
| | एकूण : | ५० | ६ | ६ | २१ | १७ | २३ | २७ |

या तक्त्यावरुन असे आढळते की,कोलाम जमातीमध्ये योजनेपूर्वी व नंतरही मासीक उत्पन्न रु. १हजार पेक्षा कमी इतक्या तळाच्या आर्थिक स्तरावर १२% लाभार्थी आहेत.

कोलाम जमातीचे ४२% लाभार्थी योजना मिळण्यापूर्वी रु.१०००ते१५००इतक्या मासिक उत्पन्न गटात होते; त्यांचे प्रमाणात योजने नंतर घट होऊन ते ३४% पर्यंत कमी झाले आहे. मात्र हा फरक माहूर तालुक्यामुळेच पडलेला असून; माहूर तालुक्याचीच आकडेवारी जर पाहीली तर हे प्रमाण ३८%वरुन १९ % पर्यंत घसरल्याचे दिलासा देणारे चित्र दिसते.

योजने पूर्वी रु. १५०० ते १७०० इतक्या मासिक उपन्न गटात कोलाम जमातीचे४६%लाभार्थी होते.योजनेनंतर त्यात वाढ होऊन हे प्रमाण ५४%पर्यंत गेले आहे.

रु.१०००ते१५००इतक्या मासिक उत्पन्न गटात किनवट तालुक्यात योजनेपूर्वी १३म्हणजे ४५% लाभार्थी होते. योजनेनंतरही ह्या गटातील एकाही लाभार्थ्यांचे उत्पन्नात वाढ होऊ शकली नाही. माहूर तालुक्यात हया गटातील लाभार्थ्यांच्या प्रमाणात योजनेनंतर थोडी वाढ झाली आहे. ज्यांचे उत्पन्न योजनेपूर्वी रु.१०००ते१५००त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन ते लाभार्थी रु. १५०० ते १७०० इतक्या मासिक उपन्न गटात आल्याचे आढळते.

सर्वात जास्त म्हणजे रु. १५०० ते १७०० इतक्या मासिक उपन्न या गटात योजनेपूर्वी किनवट तालुक्यात ४४% लाभार्थी होते व योजनेनंतरही त्यात बदल आढळला नाही. माहूर तालुक्यात योजनेपूर्वी या गटात ४८%लाभार्थी होते . हे प्रमाण वाढून योजनेनंतर ह्या गटात ६७%लाभार्थी असल्याचे आढळले.

सर्वसाधारणपणे असे दिसते की, माहूर तालुक्यातील लाभार्थ्यांची आर्थिक स्थिती किनवट तालुक्यातील लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीपेक्षा **वरच्या पातळीवर** आहे. तसेच किनवट तालुक्यातील कोलाम लाभार्थ्यांना योजनेमुळे काही फायदा मिळाला नाही.

### ३) माडीया

माडीया समाजाच्या पाहणी केलेल्या ६५ कुटुंबांपैकी भामरागड प्रकल्पातील २३ कुटुंबे होती. योजनेपूर्वी आठ लाभार्थ्यांचे मासिक उत्पन्न रु. १०००/- पेक्षा कमी होते. दोन लाभार्थी दरमहा रु. १०००/- उत्पन्न मिळवत होते. दहा लाभार्थ्यांचे मासिक उत्पन्न रु. १०००ते १५०० पर्यंत होते व तीन लाभार्थी योजनेपूर्वी रु. १५००/- पेक्षा जास्त उत्पन्न मिळवत होते. योजना मिळाल्यानंतर या प्रकल्पातील ९लाभार्थ्यांच्या म्हणजे ३९%लाभार्थ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली. उर्वरित १४ लाभार्थ्यांच्या म्हणजे ६१%लाभार्थ्यांच्या उत्पन्नात काहीच फरक पडला नाही.

## उत्पन्न वाढलेली कुटुंबे

| अ.क्र. | तालुका | कुटुंब संख्या | उत्पन्न वाढलेली कुटुंबे | % |
|---|---|---|---|---|
| १) | अहेरी | २५ | ३ | १२ |
| २) | सिरोंचा | १७ | ५ | २९ |
| ३) | भामरागड | २३ | ९ | ३९ |
| **एकूण** | | **६५** | **१७** | **२६** |

अहेरी व सिरोंचा प्रकल्पातील पाहणी केलेल्या ४२ लाभार्थ्यांपैकी योजनेपूर्वी ११ म्हणजे २६%लाभार्थी दरमहा रू. १०००/- पेक्षा कमी उत्पन्न मिळविणारे होते. योजनेनंतर उत्पन्नात दरमहा रु. १०००/- एवढे उत्पन्न असणारा एकही लाभार्थी नव्हता. योजनेनंतर हया गटातून २ लाभार्थी कमी झाले. मासिक उत्पन्न रु. १०००/- ते १५००/- हया उत्पन्न गटात योजनेपूर्वी १४लाभार्थी होते व योजनेनंतरही त्या गटात १३लाभार्थी राहीले.

मासिक उत्पन्न रु. १५०० ते १७०० ह्या उत्पन्न गटात योजनेपूर्वी १७लाभार्थी होते मात्र योजनेनंतर ह्या गटात लाभार्थ्यांच्या संख्येत वाढ होऊन ती २०पर्यंत पोचली.म्हणजेच वार्षिक उत्पन्न रू १८०००पर्यंत पोचले. व ही कुटूंबे दारिद्र्यरेषेच्या वर गेली . ही फ़ार महत्वाची बाब आहे.

अहेरी व सिरोंचा प्रकल्पातील एकूण ४२ लाभार्थ्यांपैकी आठ कुटुंबांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे.

## माडीया जमातीची उत्पन्नानुसार वर्गवारी

| अ.क्र. | तालुका | लाभार्थी | मासिक प्राप्ती रु.१००० पेक्षा कमी | | मासिक उत्पन्न १००० ते १५०० | | मासिक उत्पन्न १५०० ते १७०० | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्वी | नंतर | पूर्वी | नंतर | पूर्वी | नंतर |
| १) | सिरोंचा | १७ | १ | ० | ९ | ८ | ७ | ९ |
| २) | अहेरी | २५ | १० | ९ | ५ | ५ | १० | ११ |
| ३) | भामरागड | २३ | ८ | ८ | १२ | १२ | ३ | ३ |
| **एकूण** | | **६५** | **१९** | **१७** | **२६** | **२५** | **२०** | **२३** |


उत्पन्नातील वाढ
कोलाम२०%
माडीया २६%
कातकरी,३३%

## ३.१५ योजनेत मिळालेल्या लाभाची स्थिती

**१) कातकरी**

घरकुल, लोहाराचे साहित्य, किराणा दुकान, तेलपंप, घरघंटी, चिखलणी यंत्र व भाजीपाला कीट इत्यादी वस्तू सुस्थितीत असल्याचे आढळले. मात्र चिखलणी यंत्राचा फारसा वापर होत नाही.

**२) कोलाम**

कोलाम हया आदिम जमातीला शासनातर्फे देण्यात आलेल्या योजनांमध्ये मुख्यत: गाई, शेळया, घरकुल, संगणक, पीठगिरणी व जमीन हया बाबींचा समावेश आहे. घरकुल व जमीन या बाबी स्थावर जंगम मालमत्तेत मोडत असल्याने व ही घरे अगदी अलीकडेच बांधली असल्याने, ती दिलेल्या स्वरुपात अद्याप पावेतो शाबूत असल्याचे दिसून आले. **मात्र गाई व शेळया हयांच्याबाबत मात्र फार चिंतनीय अवस्था आहे.** पीठगिरणी, संगणक हया बाबी सुस्थितीत असल्याचे आढळून आले.

**३) माडीया**

आदिम जमातींना शासकीय योजनेव्दारे लाभ देतांना काही वस्तू व पशुधन, वराहगट, शेळीगट, मत्स्यशेतीसाठी मत्स्यबीज वगैरे बाबी प्रत्यक्ष देण्यात आल्या .

हयापैकी भामरागड प्रकल्पातील वराह गटवाटप या योजनेतून भामरागड येथील लाभार्थ्यांना दिलेल्या २१ डुकरांपैकी ५शिल्लक आहेत. बाकी सर्व मेली. हेमलकसा टोला येथे म्हशीवाटप योजनेत तीन म्हशी दिल्या होत्या. त्यातील दोन म्हशी मेल्या व एक म्हैस जगली आहे. हेमलकसा टोला येथे शेळी गटवाटप योजनेत दिलेल्या सर्व शेळया मरण पावल्या व ताडगाव मध्ये दिलेल्या शेळीगटातील ( १० + १ = ११ ) फक्त एकच शेळी शिल्लक आहे. बाकी सर्व शेळया रोगाने मरण पावल्याचे समजले. हेमलकसा टोला या गावात नर्सरी ट्रेनिंग दिले. रोपवाटीका दिलेल्या नाहीत. पी.व्ही.सी.पाईप, पीठगिरणी, उपसा सिंचन व घरकुल या योजनेमध्ये दिलेल्या बाबी सुरक्षित आहेत असे दिसले.

अहेरी व सिरोंचा प्रकल्पातील वराह पालन ही योजना झिंगानुर गावात पाच लाभार्थ्यांना देण्यात आली आहे. रोमपल्ली व गर्कापेठा गावात हया योजनेचा प्रत्येकी एक लाभधारक आहे. पैकी झिंगानूर मधील पाच लाभार्थ्यांना (२१ x ५ = १०५) डुकरे मिळाली होती. ती सर्व डुकरे मेली. फक्त १डुक्कर शिल्लक आहे. तीन लाभार्थ्यांना मत्स्य शेतीसाठी मत्स्यबीज पुरविण्यात आले. त्यापैकी २

लाभार्थी वेनलयाचे, व १ गर्कापेठ्याचे होते. एकाही लाभधारकाचा मत्स्यशेतीचा व्यवसाय चालू स्थितीत नाही. मिरची कांडप यंत्राच्या लाभार्थ्यांचे नाव यादीत असले तरी प्रत्यक्षात त्यांना ते मिळालेले नाही. सायकली व घरकुले सुस्थितीत आहेत.

*******

## ३.१६ योजनेमुळे झालेला फ़ायदा

### १) कातकरी

ठाणे जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील १८ लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ देण्यात आला त्या सर्व लाभार्थ्यांना लाभ होवून ते स्थिर जीवन जगू लागले. लोहार साहित्यामुळे लोहाराचा व्यवसाय सुरू केला गेला. तेल पंप, विहीर खोदाई, लघुपाटबंधारे उपसाजलसिंचन ह्या योजनांमुळे शेतीच्या विकासास चालना मिळाली तसेच घरघंटी सारख्या योजनांमुळेही रोजगाराची नवनवीन(साधने उपलब्ध होऊ शकली.

### २) कोलाम

सन् २००६-०७ व २००७-०८ मध्ये किनवट व माहूर तालुक्यात कोलाम या आदिम जमातीच्या ५० लाभार्थी कुटुंबाच्या केलेल्या पहाणीत असे दिसून आले की सन् २००६-०७ मध्ये दिलेल्या घरकुल योजनेच्या सर्व ४ ही लाभार्थ्यांना घराचा फायदा मिळाला आहे म्हणजेच संगणक १ पीठगिरणी १ व जमीनवाटप ७ हया सर्व लाभार्थ्यींना योजनेमुळे फायदा झाला आहे. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नातही थोडीफार का होईना पण वाढ झाली आहे. मात्र गाई व शेळया वाटप या योजना क्वचित अपवाद वगळता लाभार्थ्यांना फायदेशीर ठरलेली नाही. थोडक्यात ५० पैकी १३ ते १५ कुटुंबांना योजनेमुळे फायदा झालेला दिसतो.

### ३) माडीया

आदिम जमातींना दिलेल्या योजनांमुळे भामरागड प्रकल्पातील२३ लाभार्थ्यांपैकी ९ लाभार्थ्यांच्या उत्पन्नाच्या गटात प्रत्यक्ष भर पडली आहे तर ९ लाभार्थ्यांना घरकुल, सायकल अशा सारख्या योजनांमुळे फायदा झालेला आहे असे दृष्टोत्पत्तीस आले आहे.

अहेरी व सिरोंचा प्रकल्पातील ४२ लाभार्थ्यांपैकी ८ लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष उत्पन्नात भर पडली आहे. मात्र हया शिवाय २५ लाभार्थ्यांना वस्तू व सेवा स्वरुपात दिलेल्या योजनांमुळे ( उदा : घरकुल, वाहनचालक प्रशिक्षण वगैरे ) फायदा झाला असल्याचे दिसून आले आहे.

## माडीयाना मिळालेला योजनेचा फायदा

| अ.क्र. | योजनेचा फायदा | अहेरी (गावे ३) | | | सिरोंचा(गावे २) | | | भामरागड(गावे ६) | | | एकूण(गावे १२) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण कुटुंबे | होय | नाही | एकूण कुटुंबे | होय | नाही | एकूण कुटुंबे | होय | नाही | एकूण कुटुंबे | होय | नाही |
| १) | प्रोत्साहन भत्ता | ० | ० | ० | ० | ० | ० | ७ | ४ | ३ | ७ | ४ | ३ |
| २) | नर्सरी | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | २ | १ | १ |
| ३) | घरकुल | १० | १० | ० | १ | १ | ० | ३ | ३ | ० | १४ | १४ | ० |
| ४) | दुधाळ जनावरे | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ | ० | २ | २ | ० |
| ५) | उपसा जलसिंचन | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | १ | १ | ० |
| ६) | वराह पालन | ६ | १ | ५ | १ | ० | १ | १ | ० | १ | ८ | १ | ७ |
| ७) | शेळी गटवाटप | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | २ | २ | ० | २ |
| ८) | ऑइल इंजिन | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ३ | | ३ | ३ | ० |
| ९) | पीठ गिरणी | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | १ | १ | ० |
| १०) | संगणक | १ | १ | ० | ० | ० | ० | | ० | | १ | १ | ० |
| ११) | मिरची कांडप | ० | ० | ० | २ | ० | २ | ० | ० | ० | २ | ० | २ |
| १२) | पीव्हीसी.पाईप | ३ | ३ | ० | १ | १ | ० | १ | १ | ० | ५ | ५ | ० |
| १३) | सायकल | २ | २ | ० | २ | २ | ० | ० | ० | ० | ४ | ४ | ० |
| १४) | नवी विहीर | १ | १ | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | २ | २ | ० |
| १५) | अतिवृष्टी | १ | १ | ० | १ | १ | ० | ० | ० | | १ | १ | ० |
| १६) | वाहन चालक प्रशिक्षण | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | १ | १ | ० |
| १७) | मत्स्य | ० | ० | ० | ३ | ० | ३ | | ० | | ३ | ० | ३ |
| १८) | बांबू प्रशिक्षण | ० | ० | ० | ५ | ३ | २ | ० | ० | ० | ५ | ३ | २ |
| १९) | साउंड सिस्टीम | ० | ० | ० | १ | १ | ० | ० | ० | | १ | १ | ० |
| | एकूण : | २५ | २० | ५ | १८ | १० | ८ | २३ | १६ | ७ | ६५ | ४५ | २० |

*******

## ३.१७ योजनानिहाय विश्लेषण

**१ ) घरकुल :-** भामरागड, अहेरी व सिरोंचा प्रकल्पात माडीया लाभार्थ्यांना ठाणे व रायगड जिल्ह्यात जव्हार व पेण प्रकल्पात कातकरी लाभार्थ्यांना तसेच नांदेड जिल्ह्यात किनवट प्रकल्पात कोलामाना घरकुल योजनेचा लाभ देण्यात आला. पहाणी केलेल्या २३० लाभधारकांपेकी **आतापर्यंत ६३%**कुटुंबांना हया योजनेचा लाभ मिळाला. त्याना पक्की घरे मिळाल्यामुळे त्यांच्या राहणीत व सुरक्षितेत वाढ झाली आहे. त्यांची स्थलांतर करण्याची मानसिकता संपुष्टात आली आहे.

**२) विहीरीची खोली वाढविणे :-** कातकरी कुटूंबाना ह्या योजनेचा लाभ मिळाला.ही योजना फ़ायदेशिर ठरली आहे.

**रोपवाटीका :-** रोपवाटीका प्रशिक्षण हया योजनेचा लाभ भामरागड प्रकल्पात दोन तसेच४ कातकरी लाभार्थ्यांना देण्यात आला. त्यांना प्रशिक्षण मिळाले. परंतू त्याचा उपयोग करण्यासाठी रोपे किंवा अनुदान मिळाले नाही.तसेच प्रशिक्षणही एका लाभार्थ्याला पुरेसे न मिळाल्याने त्याला योजना लाभदायक ठरली नाही.

**लोहार साहित्यः-** कातकरी समाजाच्या १लाभार्थ्याला ही योजना देण्यात आली होती.ती त्याला उपयोगी ठरली.

**किराणा दुकान :-** कातकरी समाजाच्या ३ लाभार्थ्यांना ही योजना देण्यात आली.ती त्याना फ़ायदेशिर ठरली.

**नविन विहीर :-** माडीया व कातकरी लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला व ही योजना शेतीसाठी लाभदायक ठरली आहे.

**ऑईल इंजीन :-** कातकरी व माडीया लाभार्थ्यांना ह्या योजनेचा लाभ देण्यात आला.ही योजना राबविल्याने शेतीला पाणी मिळाल्याने उत्पन्नात वाढ होत असल्याचे आढळले.

**घरघंटीव पीठ गीरणी :-** महाराष्ट्रातील ३ ही आदिम जमातीना या योजनेचा लाभ देण्यात आला.ही योजना उपयोगी असल्याचे आढळले.

**दुधाळ जनावरे वाटप :-** भामरागड प्रकल्पात दोन लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात आला असून ही योजना लाभदायक आहे असे दिसते.

**प्रोत्साहन भत्ता :- कातकरी** व **कोलाम** या आदिम जमातींना ही योजना देण्यात आली नाही. भामरागड प्रकल्पातील लाभार्थ्यांना म्हणजे शाळेत जाणा-या **माडीया** या आदिम जमातीच्या मुलींना उपस्थितीशी संबंधित भत्ता हया योजनेचा लाभ देण्यात आला. पैकी **निरगुडवंचा गावातील मुलींना वा त्यांच्या पालकांना भत्त्याची ही रक्कम देण्यात आली नाही.** दुब्बागुडा, हेमलकसा व हेमलकसा-टोला येथील लाभार्थ्यांना हया योजनेव्दारे रोख रक्कम मिळाली व त्यामुळे शालेय साहित्य वगैरेसाठी रोख रक्कमेचा वापर करता आला व प्रोत्साहन मिळाले.

**वराह पालन :-** वराह पालन योजनेचा लाभ ज्या लाभार्थ्यांना देण्यात आला त्या लाभधारकांना या योजनेत वाटप झालेली ९०% डुकरे मेल्यामुळे काहीही फायदा झाला नाही. फक्त एकाच लाभधारकाच्या डुकरात २० डुकरांची भर पडली आहे. बरीचशी डुकरे ठेकेदाराने आंध्रप्रदेशातून आणून वाटप केल्याने त्यांना येथील वातावरण मानवले नाही व रोगराईने डुकरे मरण पावली. ही योजना लाभदायक न ठरल्याचे लाभार्थ्यांनी सांगितले.

**पी.व्ही.सी.पाईप :-** कातकरी कोलाम व माडीया ह्या सर्व लाभार्थ्यांस, हया योजनेचा लाभ मिळाला. त्या सर्व लाभार्थ्यांना त्याचा उपयोग होत असल्याचे लाभार्थ्यांनी सांगितले.परंतू काही ठीकाणी हे पाईप वाटप न करता तसेच पडून असल्याचे आढळले.

**सायकल :-** सायकल पुरवठा योजनेचा माडीया लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे व सर्वांना सायकल मिळाली असून, इतर कामांसाठी सायकलचा चांगला वापर होत आहे.

**मत्स्य शेती :-** मत्स्य शेती हया योजनेचे अहेरी व सिरोंचा प्रकल्पात गर्कापेठात एक व वेनल्या गावात दोन लाभार्थी आहेत. गर्कापेठा मधील लाभार्थ्यांचे मत्स्य बीज मेले आहे. वेनल्यामधील एका लाभार्थ्याने मत्स्यबीज विहीरीत टाकले त्यात कोणीतरी औषध टाकले व सर्व मासे मरुन तरंगू लागले. महत्वाचे म्हणजे मत्स्यबीज शेतीसाठी दिलेल्या बोडी फार लहान होत्या. मत्स्यशेतीचा अनुभव व प्रशिक्षण तसेच मार्गदर्शन नसल्याने योजना लाभदायक ठरली नाही. बोडी विषयी असे सांगण्यात आले की; मराठी भाषा समजत नसल्याने फसवणूक झाली. रु.२०००/- फक्त बोडीसाठी देऊन बोडी बांधल्यामुळे मत्स्यबीज जगले नाही. ही घटना अहेरी व सिरोंचा प्रकल्पातील आहे. या उलट भामरागड प्रकल्पातील हयाच लाभार्थी कुटुंबांकडे आलेल्या पाहुण्यांनी भामरागड प्रकल्पात हयाच योजनेसाठी रु.

४० ते ५० हजार बोडी बांधण्यासाठी वापरण्यात आल्याचे व त्या मोठया बोडीत ५ ते ६ हजार मत्स्यबीज जगविण्यात आल्याचे सांगितले.

हया वरुन असे दिसते की, ही योजना अहेरी व सिरोंचा प्रकल्पात योग्य पध्दतीने राबविली गेली नाही. अन्यथा ती लाभदायक ठरु शकली असती.

**बांबूकाम प्रशिक्षण :-** अहेरी व सिरोंचा प्रकल्पात गर्कापेठा गावात पाच लाभार्थ्यांना बांबूकाम प्रशिक्षण देण्यात आले. लाभार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले परंतू बांबू उपलब्ध नसल्याने प्रशिक्षणाचा व्यवसायासाठी उपयोग करता येत नसल्याचे त्यांनी सांगितले.

**व्यवसाय प्रशिक्षण :-** उपसा जलसिंचन, पीठगिरणी, अतिवृष्टीत मदत, संगणक प्रशिक्षण, वाहनचालक प्रशिक्षण हया योजना लाभदायक आहेत. परंतू प्रशिक्षिताला व्यवसायाभिमुख करण्यासाठी त्यांना अनुदानाची गरज आहे. अन्यथा प्रशिक्षण सरावाअभावी वाया जाईल.

**मिरची कांडप साऊंड सिस्टीम**

**भाजीपाला कीट :-** ही योजना अतीशय फ़ायदेशीर असून हीच्यामुळे आदिवासींचे उत्पन्न निश्चीत वाढले आहे.मात्र ह्या योजनेचे देखील अनुदान वाढविणे गरजेचे आहे.

**वनौषधी संयुक्त वन व्यवस्थापन व शेवगा लागवड :-**ह्या योजनाना बायफ़ मुळे प्रतिसाद दिल्याचे आढळते. तसेच ह्या योजनातून मिळणारा लाभ हा दिर्घ काळानंतर मिळणार असल्याने त्या फ़ायद्याच्या ठरल्या का हे सांगता येणे अवघड आहे.

**चिखलणी यंत्र :-**ही योजना कातकरींमध्ये राबवीली गेली.ह्या योजनेचा त्याना फ़ायदा मिळू शकला नाही.हे यंत्र त्यांचे द्रुष्टीने उपयोगाचे नाही.

**मश्रुम लागवड :-**ही योजना ११ कातकरी कुटूंबाना दिली गेली. परंतू ही योजना अशासकीय संघटनेच्या सहकार्याने राबवीली गेली.ह्या योजनेतून लाभार्थ्याना फ़ारसा लाभ मिळाल्याचे दिसत नाही.

**जमीन वाटप :-** कोलाम जमातीला प्राधान्याने ह्या योजनेचा लाभ देण्यात आला. अर्थात ती फ़ायद्याची आहेच जमीन मिळाल्याने लाभार्थ्यांच्या उत्पन्नात वाढ दिसते. कायम स्वरूपी रोजगार मिळाल्याने स्थैर्य आले.प्रतिष्ठा आली.मात्र त्याना जमीन देताना खडकाळ , नापीक ,पडीक जमीन देऊ नये.

**गॅस वाटपः-**ही योजना विषेश करून कोलामाना देण्यात आली आहे.एक तर लाभधारकाना गॅसचे वाटप केलेले नाही व तो त्याना उपयोगीही नाही. चूलीपेक्षा गॅस वापरणे सुलभ व सोईचे असले तरी आर्थीक द्रुष्ट्या अजिबात परवडणारे नाही.गॅस युनीट मोफ़त मिळाले तरी दर महा गॅसचा भूर्दंड कोणी भरायचा व कशासाठी हा प्रशण निरूत्तर करणारा आहे.

**शेळी गट वाटपः-** ही योजना अनेक आदिम जमातिच्या लाभार्थीना देण्यात आली . ही निश्चीतच फ़ायद्याची आहे. मात्र गट वाटप करताना स्थानिक स्वरूपाचे वाण देण्याचे बंधनकारक करावे.

**लघू उपसा व उपसा जल सिंचन :-** हया योजना शेतीच्या पाणीपुरवठ्यासाठी व पर्यायाने शेतीउत्पादनात वाढ होण्यासाठी आवश्यक आहेत.

*******

| आदिवासी जमातींना दिलेल्या योजना व योजनानिहाय लाभार्थी | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | योजनेचे नांव | कातकरी | कोलाम | माडीया |
| १) | घरकुल | १९ | ४ | १४ |
| २) | लघुउपसा | ६ | - | - |
| ३) | विहीरीची खोली | ४ | - | - |
| ४) | रोपवाटीका | ४ | - | २ |
| ५) | लोहार साहित्य | १ | - | - |
| ६) | किराणा | ३ | - | - |
| ७) | नवी विहीर खोदाई | ४ | - | २ |
| ८) | तेलपंप | ४ | - | ३ |
| ९) | घरघंटी | २ | १ | १ |
| १०) | शेळीगट | ६ | २४ | २ |
| ११) | चिखलणी यंत्र | २ | - | - |
| १२) | दुधाळ जनावरे | ९ | ११ | २ |
| १३) | शेवगा लागवड | २ | - | - |
| १४) | मश्रूम लागवड | ११ | - | - |
| १५) | वनौषधी लागवड | ११ | - | - |
| १६) | संयुक्त | ५ | - | - |
| १७) | भाजीपाला कीट | १० | - | - |
| १८) | चक्रीवादळ/अतीवृष्टी | १० | - | १ |
| १९) | उपसा जलसिंचन | २ | - | १ |
| २०) | गॅस | - | २ | - |
| २१) | संगणक | - | १ | १ |
| २२) | जमीन | - | ७ | - |
| २३) | मिरची कांडप | - | - | २ |
| २४) | प्रोत्साहन भत्ता | - | - | ७ |
| २५) | वराह पालन | - | - | ८ |
| २६) | पी व्ही सी | - | - | ५ |
| २७) | सायकल | - | - | ४ |
| २८) | वाहनचालक प्रशिक्षण | - | - | १ |
| २९) | मत्स्यबीज | - | - | ३ |
| ३०) | बांबू प्रशिक्षण | - | - | ५ |
| ३१) | साऊंड सिस्टीम | - | - | १ |
| | **एकूण** | **११५** | **५०** | **६५** |

*******

## ३.१८ योजना राबविण्यातील अडचणी व उपाय योजना

१) दुधाळ जनावरे, शेळ्या वाटप व वराहपालन ह्या तीनही योजना देताना योजनेचा लाभार्थ्यांना फ़ायदा मिळण्यासाठी मुख्य म्हणजे **ठेकेदारांवर जनावरे पुरविताना काही बंधने घालणे** आवश्यक आहे. जनावरे देशी/स्थानिक वाणाची व उत्पादनक्षम असतील याची खातरजमा करूनच जनावरे पुरवली जातील याची दक्षता घेण्याची सक्ती योजना राबविणाऱ्या अधिकाऱ्यांवर असली पाहिजे. तसेच लाभार्थ्यांना जनावरांच्या जोपासने संदर्भात प्रशिक्षण देणे व वरचेवर मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.जनावरांची देखभाल/स्वच्छता/खाद्य याबाबत निगा राखण्याची शिकवण लाभार्थ्यांना मिळाली पाहिजे.आदीम जमाती पशूधन नव्यानेच हाताळत आहेत ह्याची जाणीव योजना राबवीणार्यानी ठेवणे गरजेचे आहे.

२) गॅस वाटप सारख्या योजना राबविताना त्यांचा आदिवासीना उपयोग करून घेणे खरोखर शक्क्य आहे का तसेच त्या व्यवहार्य आहेत का याची पडताळणी होणे गरजेचे आहे.

३) चिखलणी यंत्र देताना तेथील भौगोलिक परिस्थितीचे भान ठेवणे आवश्यक आहे.

४) प्रोत्साहन भत्ता सारख्या योजना ज्यात रोख रक्कम वाटप करावयाची आहे अशा योजनांच्या अंमलबजावणीवर देखरेख होण्याची नितांत आवश्यकता आहे. कारण या योजनांतून फायदा न मिळाल्याच्या लेखी तक्रारी करण्यात आल्याचे निदर्शनास आले.

५) मत्स्य शेती योजना राबविताना त्यासाठी आवश्यक असलेली इतर साधन सामग्री पुरविण्यात यावी अन्यथा मासे मरून जातात.

६) कोणतेही व्यवसाय प्रशिक्षण दिल्यानंतर लगेच व्यवसाय सुरू केला तरच ते उपयोगी ठरू शकते. त्यासाठी संबंधित व्यवसाय प्रशिक्षण दिल्यानंतर उद्योग चालू करण्यासाठी आवश्यक असलेले भांडवलाचा प्रशिक्षित लाभधारकास पुरवठा करणे योग्य ठरेल.तसेच त्या उद्योगासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची उपलब्धता पडताळून मगच प्रशिक्षण देण्याचे क्षेत्र निवडावे.शेवगा लागवड योजनेसारख्या योजना पाण्याची व्यवस्था पाहून मगच दिल्या गेल्या पाहिजेत. संयुक्त वनव्यवस्थापन ही योजना देताना; लाभार्थ्यांची निवड व त्यांची कुवत लक्षात घेणे गरजेचे होते. लाभार्थ्यांची निवड योग्य झाली नाही.

७) **एका कुटुंबातील सर्व सदस्यांना मिळून एक वर्षात एक वा जास्तीत जास्त दोन योजना देण्याचे बंधन असावे.** अन्यथा एकाच कुटुंबाला अनेक योजनांचा लाभ निरनिराळ्या सदस्यांच्या नावावर मिळतो व बाकीचे लाभापासून वंचीत राहतात ही गांभिर्याने दखल घेण्याची बाब आहे .

८) आदिम जमातींची बोलीभाषा वेगळी असल्याने ह्या लाभार्थींना इतरांशी संपर्क साधण्यात अडचणी येतात. त्यांच्या शंकाचे निराकरण होणेसाठी योजना वाटपाचे वेळी एका दुभाषाची उपस्थिती अनिवार्य करावी म्हणजे त्यांची फसवणूक होण्याचे प्रमाण कमी होईल .

मुख्यत: घरकुल सारख्या योजनांमुळे त्यांना स्थैर्य मिळाले आहे. जगण्याकडे बघण्याचा त्यांचा दृष्टीकोन बदलला आहे.

शेतीच्या सुविधांमध्ये वाढ करणाऱ्या योजनांमुळे म्हणजेच लघुउपसा, विहीरीची खोली वाढविणे किंवा नवीन विहीर खोदणे, तेलपंप या योजनांमुळे शेतीच्या उत्पादनात वाढ होऊन त्यांची आर्थिक स्थिती सुधारत आहे. पीठगिरणी, किराणा दुकान, साऊंड सिस्टीम, रोपवाटीका इत्यादी योजनांमुळे आदिम जमातींना रोजगार मिळाला असून सदर योजना फायद्याच्या ठरल्या आहेत.

गॅस वाटप योजनेला आदिम जमातींचा अत्यल्प प्रतिसाद असून हया योजनेचा **त्यांना काहीही लाभ मिळालेला नाही.**

दुधाळ जनावरांचे वाटप या योजनेत लाभधारकांची **फसवणूक** होत असल्याचे निदर्शनास आले असून काहींनी ह्याबाबत लेखीही दिले आहे तसेच एकावेळी एकदम दोन जनावरांचा पुरवठा करण्यापेक्षा एकावेळी एक चांगले जनावर देऊन त्याची चांगली जोपासना केली व त्यापासून फायदा करून दाखवला तरच दुसरे जनावर मिळेल अशी पध्दत ठेवल्यास लाभार्थी जनावराचा निगुतीने सांभाळ करेल व दुग्ध व्यवसाय करणे त्यांच्या अंगवळणी पडेल. कोणतीही जोखीम व बंधने न पत्करता सहज मिळालेल्या वस्तूंच्या देखभालीबाबतची बेपर्वाई, बेफिकीरी ह्यामुळे कमी होईल असे वाटते.

*******

# प्रकरण - ४

## कातकरी, कोलाम व माडीया या अतिमागास जमातींचे अभ्यासपूर्ण विश्लेषण

### आदिम जमातींच्या वास्तव्याचे जिल्हे, तालुके, खेडे व त्या क्षेत्रातील प्रकल्प कार्यालयांची संख्या/नावे

| अ.क्र. | आदिम जमातींची नावे व २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या | प्रकल्प कार्यालयाची एकूण संख्या व नावे | वास्तव्याचा जिल्हा, तालुके, खेडे यांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | कातकरी<br>(२,१९,२०४) | एकूण (१०) प्रकल्प कार्यालये<br>डहाणू, जव्हार, शहापूर, पेण, घोडेगाव, नाशिक, कळवण, तळोदा व नंदूरबार | जिल्हे (७)-ठाणे, रायगड, पेण, अहमदनगर, नाशिक, नंदूरबार, धुळे<br>तालुके (३२)<br>खेडे (७९८) |
| २. | कोलाम<br>(२,०४,८२३) | एकूण (७) प्रकल्प कार्यालये<br>पांढरकवडा, नागपूर, गडचिरोली, अहेरी, किनवट, चंद्रपूर व चिमूर | जिल्हे (६)-यवतमाळ, वर्धा, नागपूर, गडचिरोली, नांदेड व चंद्रपूर |
| ३. | माडीया<br>(२,३२,७४०) | एकूण (४) प्रकल्प कार्यालये<br>गडचिरोली, अहेरी, भामरागड व नागपूर | जिल्हे (२)-गडचिरोली व नागपूर<br>तालुके (१४)<br>खेडे (५१२) |
| **एकूण लोकसंख्या :- (६,५६,९०७)** | | **(२१) प्रकल्प कार्यालये** | **जिल्हे (१५), तालुके (६०) व खेडे (१७४१)** |

## आदिम जमातींची प्रकल्पनिहाय लोकसंख्या व कुटुंबसंख्या

| अ क्र | राज्यातील आदिम जमातींची नावे | संबंधित जमातींचे वास्तव्य असलेल्या पाडयांची संख्या | तालुक्यांची संख्या | प्रकल्प कार्यालयाची संख्या | जिल्हयाची संख्या | २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या | पुरुष/स्त्रीया यांची लोकसंख्या | | एकूण कुटुंब संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कातकरी | ७९८ | ३२ | १० | ७ | २,१९,३४४ | १,१२,९४१ | १,०६,४०३ | ५५,३९८ |
| २ | कोलाम | ४३९ | २४ | ७ | ६ | २,०४,८२३ | १,०५,१३५ | ९९,६८८ | ५०,६०२ |
| ३ | माडीया | ५१२ | १४ | ४ | २ | २,३२,७४० | १,२१,४८१ | १,११,२५९ | ५८,१४३ |
| | एकूण | १७४९ | ७० | २१ | १५ | ६,५६,९०७ | ३,३९,५५७ | ३,१७,३५० | १,६४,१४३ |

## महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या, अनु.जमाती, आदिम जमातींची लोकसंख्या व टक्केवारी दर्शविणारा तक्ता

| जनगणना वर्ष | राज्याची एकूण लोकसंख्या (लाखात) | अनु.जमातींची एकूण लोकसंख्या (लाखात) | टक्केवारी | आदिम जमातींची लोकसंख्या | अनु. जमातींच्या तुलनेत आदिम जमातींची लोकसंख्या % |
|---|---|---|---|---|---|
| १९७१ | ५०४.१२ | ३८.४१ | ७.६२ | २.४३ | ६.३२ |
| १९८१ | ६२७.८४ | ५७.७२ | ९.१९ | ३.६६ | ६.३४ |
| १९९१ | ७८९.३७ | ७३.१८ | ९.२७ | ४.३३ | ५.१९ |
| २००१ | ६९८.७९ | ८५.७७ | ८.८५ | ६.५६ | ७.६५ |

## आदिम जमातींचे मुख्य व्यवसाय व उत्पन्नाचे स्त्रोत

| कातकरी | कोलाम | माडिया |
|---|---|---|
| शेती | लाकडी कोळसा तयार करणे | बांबूपासून घरगुती वापराच्या व शोभेच्या वेगवेगळया वस्तू बनविणे |
| गौण वनौपज गोळा करणे | वीटभट्टी | जंगल उत्पादित वस्तू विकणे |
| शिकार करणे | जळतन विकणे, जंगल उत्पादित फळे, वनौषधी, आपटा पाने विकणे | शेतमजूरी |
| मासेमारी | शेती करणे | शेती |
| शेतमजूरी | शेतमजूरी | मासेमारी |
| जंगलातील मजूरीची कामे | मासेमारी | - |

# जमात निहाय अभ्यासपूर्ण विश्लेषण

## १ कातकरी

| क्षमता/सामर्थ्य | उणीवा | उपलब्ध संधी | धोके |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १) वीटा तयार करणे. लाकडी कोळसा तयार करणे याचे उत्तम कौशल्यअवगत<br>२) मराठी भाषा अवगत<br>३) वाहतुकीची साधने उपलब्ध<br>४) जलसिंचन सुविधा बऱ्यापैकी उपलब्ध | १) अपुरे शिक्षण<br>२) पक्की घरे नाही.<br>३) भूमीहीनता<br>४) निकृष्ट आरोग्य सेवासुविधा<br>५)आत्मविश्वासाचा अभाव व कमकुवत सामाजिक संघटन<br>६) पिण्याच्या पाण्याचा प्रश्न<br>७) स्थलांतर | १) वनअधिकार कायदा २००६<br>२) गौण वनौपज गोळा करुन त्याची विक्री करणे<br>३) व्यवस्थापन विकास यंत्रणेतील प्रत्यक्ष सहभाग | १) ठेकेदारांकडून होणारी पिळवणूक |

## २ कोलाम

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| १) बांबूपासून उत्कृष्ट वस्तू तयार करणे<br>२) मराठी व कोलामी भाषा उत्तमरित्या अवगत<br>३) बऱ्यापैकी वाहतुकीची साधने उपलब्ध | १) अपुरे शिक्षण<br>२) राहती घरे नाहीत<br>३) भूमीहीनता<br>४) निकृष्ट आरोग्य सोईसुविधा<br>५) शेतीबाबत अपुरी माहिती<br>६) पिण्याच्या पाण्याचा प्रश्न | १)वनअधिकार कायदा-२००६<br>२)गौण वनौपज गोळा करुन त्याची विक्री करणे<br>३)व्यवस्थापन विकास यंत्रणेतील प्रत्यक्ष सहभाग | १)ठेकेदारांकडून होणारी पिळवणूक<br>२) अन्नधान्य टंचाई |

## ३ माडीया

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| १)जंगल व त्यापासून मिळणाऱ्या नैसर्गिक उत्पन्नाचे स्त्रोत<br>२)पारंपारिक संस्कृती जतन केल्याने समाजएकीची घट्ट वीण<br>३)स्वत:ची बोलीभाषा<br>४) शिकारीची कला | १) अपुरे शिक्षण<br>२) दूरदृष्टीचा अभाव<br>३) समाजाची कमकुवत पायाभूत मांडणी<br>४) हलकी/बरड जमीन<br>५) सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा प्रश्न<br>६) भूमीहीन<br>७) निकृष्ट आरोग्य सेवासुविधा | १) वनअधिकार-२००६ च्या कायदयाची अंमलबजावणी<br>२) गौण वनौपज, वनौषधी व वन्यजीव यामधील दुवा<br>३) जंगल व सजीव सृष्टी पर्यटन | १)नक्षलवाद<br>२)अन्नधान्यटंचाई, अपुरा धान्यसाठा<br>३) इतर जमातींकडून होणारी पिळवणूक |

# आदिम जमातींच्या समस्या आणि ११ व्या पंचवार्षिक योजनेत विचारार्थ योजना

| अक्र. | बाब | समस्या | विचारार्थ योजना |
|---|---|---|---|
| १) | आरोग्य | अ) दूषित पाण्यामुळे होणारे आजार व इतर आजार उदा.हिवताप, क्षयरोग, त्वचेचे विकार, महारोग, न्युमोनिआ<br>ब) बालकांमधील कुपोषण व मातांमधील रक्तक्षय (ॲनिमिया) | १) आरोग्य जनजागरण शिबीरे<br>२) अंगणवाडी सेविकेला अतिरिक्त मदत देणे<br>३) आरोग्यरक्षक (पाडा वर्कर, दाई इत्यादी) यांना प्रशिक्षण देणे व प्रथमोपचार साहित्य पुरवठा |
| २) | घरे व जमीन यांची मालकी | अ) बेघर<br>ब) पक्क्या घरांची कमतरता<br>क) कुटुंब व गुरेढोरे यासाठी एकच झोपडी<br>ड) भूमीहीनता व परस्वाधीनता | १) आवास(संडास,बाथरुम,वीज, पाणी इत्यादी सुविधायुक्त पक्की घरे देणे)<br>२) दुधाळ जनावरांसाठी शेड (निवारा)<br>३) वनाअधिकार कायदा-२००६ ची अंमलबजावणी |
| ३) | शिक्षण | अ) निष्क्रियता (नावड)<br>ब) शाळागळती | १) शाळा सोडलेल्या मुलांसाठी वर्ग सुरु करणे<br>२) आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शैक्षणिक महत्व पटवून देण्याबाबत माहिती कार्यक्रम तयार करणे |
| ४) | संस्कृती | अ) सांस्कृतिक कार्यक्रम घेण्याविषयी उदासिनता | १) संग्रहालय किंवा प्रदर्शनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजनासाठी मदत |
| ५) | पिण्याचे पाणी | अ) अपुरा पाणीपुरवठा<br>ब) दूषित पाण्यापासून होणारे रोग | १) विंधनविहीरी खणून त्यावर हातपंप बसविणे.<br>२) पाडया-वस्त्यांना शुध्द पाण्याचा पुरवठा |
| ६) | कृषी/फळबाग /दुग्धव्यवसाय | अ) जलसिंचनाच्या सोईची अनुपलब्धता<br>ब) बरड जमीन<br>क) परंपरागत शेती व्यवसाय | १) नवीन विंधन विहीरी खणणे<br>२) १००% शासकीय अनुदानावर भूमीहीन आदिम जमातीला जमीन उपलब्ध करुन देणे<br>३) सर्वोषधी व फळबाग लागवड कार्यक्रम राबविणे<br>४) शेती अवजारे पुरवठा<br>५) रोपवाटिका तयार करणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ६) उपसा जलसिंचन<br>७) ठिबकसिंचन<br>८) वेगवेगळया धान्याचे मळणीयंत्र |
| ७) | रोजगार व उत्पन्न वाढीच्या योजना | अ) स्वयंरोजगारासाठी अपुरे तांत्रिक ज्ञान<br>ब) स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य<br>क) शेती व शेतीविषयक अपुरी साधने | १)संगणकाचे प्रगत ज्ञान बेरोजगारांना देणे<br>२) वीटभट्टी अर्थसहाय्य<br>३) दुधसंकलन व प्रक्रिया केंद्र उभारणे<br>४) हस्तकला उद्योगासाठी स्वयंपूर्ण गट स्थापन करणे<br>५) निर्मिती व विपणन केंद्र उभारणे<br>६) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना प्रभावीपणे राबविणे |
| ८) | पायाभूत सोई | अ) दुर्गम भागात वाडया, पाडे<br>ब) वीजपुरवठा नाही<br>क) पिण्यासाठी व जलसिंचनासाठी पाण्याची अनुपलब्धता | १) दुर्गम भागात रस्तेबांधणी करुन वाडया/पाडे जवळच्या गावांना जोडणे<br>२) लहान पूल बांधणे<br>३) आदिम जमातींकडून नालाबडिंग, शेततळे, जंगलतळे यांची काम करुन घेणे<br>४) सौरउर्जा, पवनउर्जा सयंत्र<br>५) बसविणे (रु.१७.५० लाख मर्यादेपर्यंत) व ९०% GOI अनुदान |

वरील योजना राबविण्याचे उद्देश व उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

अ) आदिम जमातींच्या लोकांचे जीवनमान सुधारणे.

ब) त्यांचा सामाजिक-आर्थिक दर्जा उंचावणे.

क) त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे.

ड) निवारा, शिक्षण, आरोग्य इत्यादी मुलभूत गरजा पुरविणे

इ) त्यांच्या चालीरिती व संस्कृती जतन करणे

फ) आदिम जमातींच्या महिलांचे सबलीकरण (सशक्तीकरण) करणे.

**********

# प्रकरण ५

## सा रां श

आदिम जमातींना दिलेल्या लाभाच्या योजना कशा पध्दतीने राबविण्यात आल्या;व आदिम जमातीना त्याचा कितपत फ़ायद्याच्या ठरल्या याचे मुल्यमापन करण्यासाठी ठाणे व रायगड जिल्हयातील **"कातकरी"**, नांदेड जिल्हयातील **"कोलाम"** व गडचिरोली जिल्हयातील **"माडीया"** या आदिम जमातींच्या एकूण २३० कुटुंबांची पाहणी करण्यात आली. पाहणीमध्ये जवळ जवळ २४ ते २५ योजना मिळालेल्या आदिम जमातींच्या लाभार्थींना प्रत्यक्ष भेटी देण्यात आल्या.काही ठराविक योजना वगळता; आदिम लाभार्थींसाठी राबविण्यात आलेल्या योजनांचा त्यांना फायदा झाला नाही.

**१) स्थलांतर :-** ३६ % कातकरी, ६ % माडिया व १८ % कोलाम स्थलांतर करतात म्हणजेच पहाणी केलेल्या एकूण २३० आदिम लाभार्थ्यांपैकी ५४ लाभार्थी स्थलांतर करीत असून; स्थलांतराचे प्रमाण २३% आहे. एकूण आदिम जमातींच्या स्थलांतरापैकी **७६ % वाटा कातकरींचा** आहे.

**२) घरांची स्थिती :-** या पार्श्वभूमीवर ३०% कातकरींची घरे कच्ची असून, २०% माडिया व ८% कोलामांची घरे कच्ची आहेत.

**३) भूधारणा :-** पाहणी केलेल्या आदिम जमातींच्या २३० कुटुंबापैकी १०९ कुटुंबे भूमीहीन असून, **भूमीहीनांचे प्रमाण ४७%** आहे. ५५% कातकरी भूमीहीन असून रायगड जिल्हयातील भूमीहीन कातकऱ्यांचे प्रमाण ७२% आहे व ६८% कोलाम भूमीहीन आहेत तर **केवळ ५% माडिया भूमीहीन** आहेत.

**४) साक्षरता :-** ३९% कातकरी साक्षर असून, ५२% माडिया व ५५% कोलाम साक्षर आहेत. महिलांच्या साक्षरतेमध्ये कातकरी महिलांचे प्रमाण ४१% आहे. माडियामध्ये हे प्रमाण ४२% असून, कोलामामध्ये ४३% आहे. म्हणजेच आदीम जमातींच्या साक्षरतेचे प्रमाण ४८%आहे.व महीला ४२%साक्षर आहेत.

५) उत्पन्नात वाढ :- आदिम जमातींच्या पाहणी केलेल्या एकूण २३० लाभार्थ्यांपैकी निरनिराळया योजना राबविल्यानंतर एकूण ६५ लाभार्थ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली असून, हे प्रमाण फक्त २८% आहे. कातकरींच्या ३३% कुटुंबाच्या, २६% माडीया कुटुंबाच्या व २०% कोलाम कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ

झालेली आहे.

**आदिम जमातींची स्थिती**

| अ.क्र | बाब (%) | कातकरी | कोलाम | माडीया |
|---|---|---|---|---|
| १) | स्थलांतर | ३६ | १८ | ६ |
| २) | कच्ची घरे | ३० | २० | ८ |
| ३) | भूमीहीन | ५५ | ६८ | ५ |
| ४) | साक्षरता | ३९ | ५५ | ५२ |
| ५) | महिलांची साक्षरता | ४१ | ४५ | ४२ |
| ६) | उत्पन्नात वाढ | ३३ | २० | २६ |
| | आदीमता गुणानुक्रम | प्रथम | व्दितीय | तृतीय |

वरील तक्त्यावरून असे आढळते की, सर्वांत कातकरी ही जमात भूधारणेचे प्रमाण वगळता मागासलेली आहे.. अद्यापही त्यांच्या कच्च्या घरांचे प्रमाण सर्वांत जास्त असून, स्थलांतरही सर्वांत जास्त त्यांनाच करावे लागते. साक्षरतेचे प्रमाण सुध्दा कमी असून, अजूनही ५९% महिलांना अक्षर ओळख देखील नाही. एकूण कातकऱ्यांपेकी ७२%कातकरी फ़क्त रायगड जिल्हयात आहेत.

असे असूनही सदरील योजनांचा सर्वांत जास्त लाभ त्यांनाच घेता आला आहे. कदाचित महाराष्ट्र शासनाच्या कामकाजाच्या मराठी भाषेची समज हे ही कारण ह्यामागे असू शकेल.

*******

# प्रकरण ६

## निष्कर्ष

आदिम जमातींच्या आर्थिक सुधारणा होण्याच्या दृष्टीने विविध प्रकारच्या जवळ जवळ २५ योजना १००% अनुदानावर राबविण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामध्ये कातकरी, कोलाम व माडीया हया महाराष्ट्रातील तीन आदिम जमातींचा समावेश होता.

ठाणे व रायगड जिल्हयांमधील **"कातकरी"**, नांदेड जिल्हयामधील **"कोलाम"** व गडचिरोली जिल्हयामधील **"माडीया"** जमातींच्या कुटुंबांना सदरहू योजना कितपत उपयुक्त ठरल्या हयाचे मूल्यमापन करण्यासाठी घेतलेल्या पाहणीतून **७३% कुटुंबांच्या आर्थिक स्तरात काही बदल झालेला नाही** असे आढळून आले.

घरकुल योजना, शेतीच्या सुविधांमध्ये वाढ करणा-या योजना, जमीन वाटप व काही रोजगार देणाऱ्या योजना वगळता अन्य योजनांमधून या जमातींच्या कुटुंबांना फायदा झालेला नाही.

*******